
हैबतीकृत अद्वैत वेदांतपर

# तूर्त बोध




श्री सद्गुरू निरंजन महाराज आश्रम, मौजे वडगांव, जि. कोल्हापूर.

॥ ॐ ॥

॥ श्री सद्गुरु प्रसन्न ॥



## श्री सद्गुरु निरंजन महाराज

| | |
|---|---|
| जन्म - दि. १० जानेवारी १९०२ | निर्वाण - २१ डिसेंबर १९९७ |
| सकाळी ७.१५ वाजता | सायंकाळी ६.१० वाजता |
| कौलापूर, जि. सांगली | मिरज ढवळी, जि. सांगली |



## ॥अथ तूर्तबोध प्रारंभ ॥

श्री गणेशायनम: ॥ श्री सरस्वत्यैनम: ॥ श्री गुरुभ्योनम: ॥ श्री कुलदेवतायैनम: ॥ श्रीमातापितृभ्यांनम: ॥ श्रीआदिपुरुषायनम: ॥ जय जयाजी गणपतिराया ॥ निरसोनीया सकळ माया ॥ न्यावे मज मुळाच्या ठायां ॥ कृपा करोनि ॥१॥ जय जयाजी गणपति ॥ बोलवी मज अध्यात्म मति ॥ जेणे प्रकाशे स्वयंज्योती ॥ नित्यानित्य ॥२॥ तूं गणाधीश गणगोसावी ॥ माझे मज चुकले वर्म दाखवी ॥ जीवशिवापरते भेटवी ॥ दीनदयाळा ॥३॥ जय जयाजी गणराजा ॥ वक्रतुंडा वक्रपूजा ॥ शोभती चारी भुजा ॥ महाशोभा ॥४॥ जय जयाजी लंबोदरा ॥ मज न्यावें मुळाच्या घरा ॥ चुकवी जन्ममरणाचा फेरा ॥ कृपा करोनि ॥५॥ जय जयाजी शारदे देवी ॥ जें जें आठवलें माझे जीवी ॥ बोलली अध्यात्माची पदवी ॥ दीनदयाळे ॥६॥ जय जय वो शारदे वेल्हाळा ॥ चाले तुझेनि कवित्वकळा ॥ फुटे ब्रह्मरसाचा जिव्हाळा ॥ महासंतोषे ॥७॥ जय जय वो ब्रह्मचारी ॥ तूं तारिसी भवसागरी ॥ अज्ञानातें परतें सारी ॥ महादेवी ॥८॥ जय जय वो शारदे ॥ बोलवी ग्रंथीचे गुज ॥ तूर्तबोधाचे बोधवी बीज ॥ महाशक्ती ॥९॥ जय जय वो शारदे आनंदी ॥ भक्तां स्थापिसी निजपदी ॥ चाले तुझेनि कवित्वसिद्धी ॥ महाकृपाळे ॥१०॥ जय जया वो श्रीगुरुनाथा ॥ म्यां चरणांवरी ठेवोनिया माथा ॥ अध्यात्म बोलवी आतां ॥

दीनदयाळा ॥११॥ जय जय वो सद्गुरु ॥ तुझेनि कृपे अज्ञान परतें सारूं ॥ महा सुखाते हेरूं ॥ स्वामिया ॥१२॥ जय जयाजी सद्गुरुस्वामी ॥ दाविसी रामरूप रामी ॥ तूं चाळक अंतर्यामी ॥ सदोदित ॥१३॥ तूं दाविसी निजाचा निजठेवा ॥ तुझेनि साक्ष जीवशिवा ॥ काय करूं म्यां व्यर्थ हेवा ॥ अनाथबंधु ॥१४॥ जय जयाजी गणपतीराया ॥ तूर्तबोध ग्रंथ करावया ॥ दे मज कवित्व रसना या ॥ अध्यात्म शोधावया ॥१५॥ तूर्तबोध ग्रंथ अमोल ॥ तेथींचे अध्यात्म महा खोल ॥ तेथें हैबतीचे बापुडें काय बोल ॥ मतिहीन ॥१६॥ जय जयाजी सद्गुरुस्वामी ॥ ज्ञानाची झाली स्वामी ॥ भुली पडली आत्मारामी ॥ काय म्हणोनिया ॥१७॥ मजसीच मी नेणोनि ॥ ज्ञानाची केली महा हानी ॥ कैसे होईल निधानीं ॥ न कळे मज स्वामिया ॥१८॥ या संसारें वेडें केलें ॥ जनादेखता जन मेले ॥ कांही सार्थक नाहीं झाले ॥ पडली भूली ॥१९॥ मजसीच मी नेणतां ॥ काळ करी थोर सत्ता ॥ पडली अघोर चिंता ॥ कायरे करूं ॥२०॥ मज कांही भासेना ॥ आत्मरूप ठसेना ॥ सार्थक कांही दिसेना ॥ थोर हानि ॥२१॥ पडलों निशीचे अंधारी ॥ आत्मसुखाची झाली चोरी ॥ चौर्याशीची आली हारी ॥ सद्गुरुराया ॥२२॥ सद्गुरुदातारा ॥ ने मज निजमंदिरा ॥ चुकवी जन्माचा फेरा ॥ दीनदयाळा ॥२३॥ मातेच्या उदरी ॥ अजपा जप करी ॥ येऊनियां बाहेरी ॥ चुकी मोठी ॥२४॥





हातींचे गेले निजधन ॥ तेणे दुःख झाले दुणें ॥ कैसे अदृष्ट आले उणे ॥ न कळे मज ॥२५॥ मी पडलो मायाजळी ॥ कोण सोडवील ये काळी ॥ पाठी लागली जन्माची पाळी ॥ कायरे करूं ॥२६॥ या संसारचेनिमुळे ॥ माझे आत्मसुख मज न मिळे ॥ जाचिती क्रामक्रोधादिक कुळे ॥ कैसे करूं ॥२७॥ या संसारापासूनि वेगळे करावे ॥ माझे आत्मस्वरूप मज भेटवावे ॥ मुळाच्या घरासी मज न्यावे ॥ दीनदयाळा ॥२८॥ मी चुकलो आपल्या ठाया ॥ नेणोनि भक्ति उपाया ॥ मज तारावे गुरुराया ॥ भवसागरी ॥२९॥ माझी मज पडली चुकी ॥ अविंद वस्तु बाण सुलखी ॥ तेथें कैसी लागेल टांकी ॥ स्वयंभू गोळा ॥३०॥ आत्म्याची नाही अझुनी भेटी ॥ परि काळ लागला असे पाठी ॥ पडलो महा आटाआटी ॥ स्वामीराया ॥३१॥ आंता राया ऐसे करावें ॥ माझे मज भेटवावें ॥ जेथिले तेथें ठेवावें ॥ कृपादृष्टी करोनी ॥३२॥ प्रपंचाची आटाआटी ॥ लोभेसी असे पडली मिठी ॥ कैसें होईल शेवटीं ॥तें कळेना गुरुराया ॥३३॥ माझें मजला भेटवी ॥ निज डोळ्यांनी दाखवी ॥ ब्रह्मरसाते चाखवी ॥ दीनानाथा ॥३४॥ राया संसार महाघोर ॥ वेढले कैसे थोर थोर ॥ लागला पाठीं काळचोर ॥ दुःख मोठे ॥३५॥ लागली असे माया ममता ॥ देवा चुकलों निजहिता ॥ तारीं मज आंता ॥ दीनदयाळा ॥३६॥ आंता ऐकुनी बोले सद्गुरुमुनी ॥ धन्य शिष्या शिरोमणी ॥ लागे आंता अजपाचे

ध्यानीं ॥ जेणे स्वरूप तुला कळे ॥३७॥ बोले कैवल्यनाथ सद्गुरु ॥ तुझे स्वरूप तुझकडे मोहरूं ॥ तुज मज हेचिं तारूं ॥ तारावया ॥३८॥ तूं तापलासी भवतापें ॥ आंता सांगेन सुख सोपें ॥ जेणे हरतील महा पापें ॥ निर्मळ होसी ॥३९॥ तुंवा संतसंगती धरावी ॥ लाधेल आत्मपदाची पदवी ॥ मूळचि सोय हे लावी ॥ सद्गुरुकृपे ॥४०॥ साधनेवीण देखणें देखावे ॥ देव होऊनी देवापोटी रिघावे ॥ निरंतर शुचिर्भुत असावें ॥ देवपूजेसी ॥४१॥ तुझे गुज असे तुझपुढें ॥ ते कोणासी नातुडें ॥ नेणोनि त्वां होसी मुढ ॥ वेडेपणें ॥४२॥ संतांची संगति थोर देहीं होय चमत्कार ॥ दिसों लागे सारासार ॥ संतसंगतीनें ॥४३॥ संतांची संगति करावी ॥ तुझी वस्तु तुज होईल ठावी ॥ जेथें तेथें देखणी कळा देखावी ॥ निजात्मखुणे ॥४४॥ न कळे या संतांचा महिमा ॥ भेटविती आत्मया रामा ॥ देवाविण ठाव नाहीं रिकामा ॥ देवचि दिसे सारा ॥४५॥ देखणें परतें सारावें ॥ देखणेविण देखावें ॥ रूपावीण ओळखावे ॥ आत्मरूप ४६॥ मुळाविण मुळीं जावें ॥ रूपाविण रूपी रिघावे ॥ देवाविण देखावे ॥ साक्षरूप जें ॥४७॥ तूं शिष्य परम चतुर ॥ पुसतोसी अध्यात्मविचार ॥ उल्हासविला सुखसागर ॥ निजभर्तेचेनिभरें ॥४८॥ शिष्या थोर पडिला चुका ॥ नेणति अध्यात्महित कौतुका ॥ समाधीच्या महासुखा ॥ पडली भुली ॥४९॥ थोर दुःख मातेचे पोटीं ॥ दुःखे झाली कोट्यानुकोटी





॥ आत्मरूपी नाहीं भेटी ॥ थोर हानि ॥५०॥ देह पडे काळाचे खर्ची ॥ दृष्टि नाहीं आत्मसुख चर्ची ॥ शुद्धी नाहीं मूळ मुक्तघरची ॥ शिष्या दुःख मोठे ॥५१॥ देहिंच्या जाणोनि खाणाखुणा ॥ देहावेगळा देव जुनाट जुना ॥ कोठें नाही अधिक उणा ॥ शिष्यराया ॥५२॥ शिष्या तुझी अक्कल कोणती ॥ हारपले चिन्मय मोतीं ॥ नेणसी आत्मज्योती ॥ शिष्या दुःख मोठे ॥५३॥ तूं जाण देहींच्या देवा ॥ तुझी तुज घडेल सेवा ॥ लाधेल जन्मोजन्मीचा ठेवा ॥ सद्गुरुकृपे ॥५४॥ शिष्या तुझें भाग्य अफाट ॥ पुससी आत्मत्वाची वाट ॥ जयासी नाहीं पाठपोट ॥ तें देखसी निजडोळां ॥५५॥ देव देहीं किं देहावेगळा ॥ कोठें जाणावी आत्मकळा ॥ कोण फिरवी अजपाची माळा ॥ न कळे तुज भ्रांतिमुळे ॥५६॥ देव कैसा देखावा ॥ हा अनुभव कैसा घ्यावा ॥ देव कोठें ओळखावा ॥ शिष्या तुज न कळे ॥५७॥ शिष्या तुझें तूं नेणसी ॥ गर्भी कासावीस होसी ॥ नाना योनी हिंडलासी ॥ हें दुःख कोण सोडवी ॥५८॥ पाठीं लागली जन्माची पाळी ॥ गळां तों अज्ञान सांखळी ॥ वस्तु हे अखंड मोकळी ॥ न कळे तुज शिष्या ॥५९॥ म्हणोनि तुज पडिला घाला ॥ अंतकाळी कोण सोडवी तुजला ॥ धरीं श्रीगुरुच्या चरणांला ॥ तरीच सार्थक होईल ॥६०॥ तूं नेणसी संतसेवा ॥ चुका पडिला आत्मया देवा ॥ सद्गुरुचरणीं रीघ करावा ॥ जन्मावेगळा होशील ॥६१॥तुझे

तुजला हे सुख पावे ॥ जेणे भेटे देवाधिदेव ॥ ऐसा न करिसी कां उपाय ॥ सार्थकाचा ॥६२॥ आपण तरला नाहीं ॥ दुसऱ्याते तारूं पाही ॥ लटकी देतो ग्वाही ॥ तरलों म्हणोनीं ॥६३॥ ऐसीयचेनी उपदेशें ॥ देव हा कसा दिसे ॥ लागला जन्ममरणाचा सोस ॥ कैसा चुके ॥६४॥ आंधळ्यासी आंधळा पंथ विचारी ॥ पंथे चालता दोघे पडले गारी ॥ त्यासी पाहिजे सुज्ञ शेजारी ॥ काढावयासी ॥६५॥ बैसवूनी शिष्यांचा पाळा ॥ बोधविती मंत्र तंत्र कळा ॥ आमुचा हाची मुक्तीचां सोहळा ॥ ऐसे म्हणती ॥६६॥ ऐसियांचा उपदेश घेतां ॥ देव कैसा येईल हातां ॥ पाठी लागे जन्ममरणाची चिंता ॥ उपदेशे कैसे तरावें ॥६७॥ ऐसे गुरु कवडीचे तीन ॥ गुरुशिष्यांचे धिक् जीवन ॥ दोहींसी न कळे आत्मखूण ॥ पडिले जन्मफेरी ॥६८॥ जाती तेची घरोघरीं ॥ उपदेशिती नरनारी ॥ आम्ही पोटाचे भिकारी ॥ तारक मोठे ॥६९॥ गुरुने शिष्य केला ॥ देऊनी मंत्राचा हवाला ॥ हा उपदेशी काय म्हणे भला ॥ दोघां गति एकची ॥७०॥ गुरु मिळाला रागिष्ठ ॥ मंत्रतंत्राची खटपट ॥ शिष्या न कळे कांही बोधाची वाट ॥ चुरचुर करी बोधविण ॥७१॥ हा उपदेश म्हणावा काय भला ॥ तेथें देव हातीचा गेला ॥ गुरुशिष्या अंत एकचा आला ॥ मग मुक्ती कैंची ॥७२॥ ऐसियांचे बसतां शेजारीं ॥ आत्मसुखाची झाली चोरी ॥ जन्ममरणाची आली हारी ॥ तारक कैसा हा गुरु





॥७३॥ तो पुरता नव्हे वाटाड्या ॥ पायी पडती प्रपंच बेड्या ॥ कोण सोडवील रे वेड्या ॥ भुललासी ॥७४॥ हा उपदेश नांही कार्याचा ॥ कैसा फिटेल पांग जन्ममरणाचा ॥ जेंव्हा येईल अंत निकट जीवाचा ॥ कोण सोडवील ॥७५॥ घरोघरी उपदेश थोर ॥ तो गुरु प्रत्यक्ष चोर ॥ पाठीं लावी जन्ममरणाचा घोर ॥ दोघांसी आत्मभुली ॥७६॥ गुरु पाहतां लक्षानुलक्षी ॥ कोणी नाहीं स्वरूप साक्षी ॥ नागवले दोहीं पक्षीं ॥ हळहळ मोठी ॥७७॥ हा उपदेश किमर्थ ॥ पदरीचा गेला परमार्थ ॥ कांही न लाभे ज्ञान अर्थ ॥ थोर आत्मभुली ॥७८॥ जेथें आत्मज्ञान नसे ॥ जन्ममरण केंवी नासे ॥ आत्मबिंब कांही न प्रकाशे ॥ पडिला महाघोरी ॥७९॥ जेथें आत्मज्ञानाचा वीट ॥ तेथें परवस्तूसी केंवी होय भेट ॥ जन्ममरणाची खटपट ॥ लागली पाठी ॥ ८०॥ या गुरुचे दृष्टी ॥ केवीं मावळे त्रिपुटी ॥ आत्मया नाही भेटी ॥ व्यर्थ उपदेश ॥८१॥ या गुरुच्या उपदेशें ॥ आत्मत्व केंवी दिसे ॥ पाठी लागलें जन्ममरणाचे पिसें ॥ पातक मोठे ॥८२॥ ऐसा हा गुरु ॥ कैसा तारी भवसागरु ॥ न कळे अजपा विचारू ॥ भौंदुपणा मिरवी ॥८३॥ ज्याचे त्यासी वर्म न कळे ॥ सेवेसाठी शिष्यावरी डोळे ॥ काम क्रोध आक्रोशे खवळे ॥ अज्ञान जैसा ॥८४॥ अध्यात्म चर्चा नावडे ॥ शिष्यासहित भवसागरी बुडे ॥ मायेचा पडदा लाऊनी आडे ॥ स्वरूप न देखे ॥८५॥ म्हणती शिष्य फार करावें

॥ गुरुशिष्या न कळे देव ॥ या गुरत्वास बुडतां उपाय ॥ तारीना कोणी ॥८६॥ सद्गुरुची लक्षणें ॥ सांगेन आत्मसाक्षेने ॥ केले मज रक्षण ॥ भवसागरी ॥ ८७॥ सद्गुरुची लक्षणे ॥ बोलती वेदपुराणे ॥ लाधविती महा खुणें ॥ रूपेंकरून ॥८८॥ ऐसा गुरु करावा ॥ लाभेल आत्मसुखाचा ठेवा ॥ भेटवी देवाचीया देवा ॥ दीनदयाळ जो ॥८९॥ सद्गुरु दीनदयाळ ॥ भेटवी आत्मस्वरूप तत्काळ ॥ दाखवी अजपाची माळ ॥ तोची धन्य सद्गुरु ॥९०॥ सद्गुरु तोची चालवी ॥ रूपेंकरून आळवी ॥ स्वरूप दाऊनी स्वरूपासी भाववी ॥ तोचीं सद्गुरु ॥९१॥ सद्गुरुमहाराज ॥ स्वरूपी सजला साज ॥ प्रगटोन दावीं आत्मगुज ॥ निजडोळां ॥९२॥ या नयनापरता नयन दाखवी ॥ बारा सोळा आटणी आठवी ॥ साक्षात् स्वरूप भेटवी ॥ तोची सद्गुरू करावा ॥९३॥ सद्गुरु पुरता करावा ॥ जीवशिवाचा ठाव होईल ठावा ॥ सहज स्वरूपी होईल रिघावा ॥ सद्गुरुचेनी बळें ॥९४॥ सद्गुरू थोराचाही थोर ॥ चुकवी जन्मरणाचा घोर ॥ करी शिष्या पैलपार ॥ तोची सद्गुरु ॥९५॥ धन्य तो सद्गुरुमुनी ॥ दाखवी चिन्मयरत्नाची खाणी ॥ वस्तु दाखवी प्रत्यक्ष नयनी ॥ तोची सद्गुरू जाणावा ॥९६। सद्गुरू भलता शोधावा ॥ त्याचेनि संगति आत्मा देखावा ॥ उगव स्वरूपी करावा ॥ सद्गुरुचेनि बळें ॥९७॥ सद्गुरु बापाचाहि बाप ॥ हरी जन्ममरणाचे ताप ॥ भेटवी





आत्मस्वरूप ॥ तोची धन्य सद्गुरु ॥९८॥ सद्गुरु करावा प्रचंड ॥ स्वरूपी दर्शन अखंड ॥ ज्या उपदेशे जन्ममरण खंडे ॥ तोचि कृपाळू ॥९९॥ सद्गुरु निजदाता ॥ परेहुनी परता ॥ भेटवी या अनंता ॥ तोचि स्वामिया ॥१००॥ सद्गुरु स्वामी भोळा ॥ उघडी डोळीयापरता डोळा ॥ फिरवुनी महाकाळा ॥ अक्षयपदी अक्षय कर ॥१०१॥ सद्गुरु पूर्णाचाही पूर्ण ॥ भेटवी जुनाट जुनें ॥ हाती धरूंनी दावी आत्मखूण ॥ तोचि सद्गुरु ॥१०२॥ सद्गुरुचेनि रूपें ॥ झालें समाधीसुख सोपें ॥ घटमठीं दाटलें आपोआपें ॥ स्वरूप निजबळें ॥ १०३॥ सद्गुरु जरी समर्थ भेटे ॥ तरी जन्ममरणाचा अंत तुटे ॥ येणें जाणें खुंटे ॥ स्वरूपाचेनि बळे ॥१०४॥ सद्गुरु बरवा ओळखावा ॥ त्याते अक्षय उपदेश मागावा ॥ या दत्त गोरखाचा ठेवा ॥ हाती लागे ॥ १०५॥ ऐसियासी शरण जावें ॥ जुनें ठेवणें मागावें ॥ ठायी ठायी धन साठवावे ॥ निजबळें ॥१०६॥ सद्गुरु महाराजा ॥ दाखवी हिताच्या हितगुजा ॥ माझी मजला होतसे पूजा ॥ देवावीण ॥१०७॥ सद्गुरु दाखवी निजपदा ॥ समाधीस सुख सदा ॥ काय सांगी या आनंदा ॥ सुख मोठें ॥ १०८॥ सद्गुरु करावा भला ॥ जन्ममरणाचा उकली उकला ॥ डाव दाखवी प्रत्यक्ष चुकला ॥ दयाळुत्वे ॥१०९॥ धन्य सद्गुरुनाथ ॥ दाखवी वस्तु धरूनि हात ॥ बोलवी अध्यात्माची मात ॥ तूर्तबोधग्रंथी ॥११०॥ सद्गुरु अज्ञान परतें सारीं ॥ देखणे

दावी दशवे द्वारीं ॥ इंद्रिये कोंदिली सारीं ॥ समाधिसुख ॥१११॥ सद्गुरुसारिखा धनी ॥ ध्यानीं चढले उन्मनी ॥ देखणी दुणावें दुणी ॥ स्वरूप देखावया ॥११२॥ सद्गुरुचरणी मारावी मिठी ॥ आत्मस्वरूपी होईल भेटी ॥ हरती जन्ममरणाची कोटी ॥ सद्गुरु बळें ॥११३॥ या सद्गुरु उत्तमा ॥ भेटवी आत्मारामा ॥ परेपरता आत्मारामा ॥ साक्षरूपें भेटवी ॥११४॥ सदगुरु करावा साच ॥ हरे जन्ममरणाचा काच ॥ दाखवी स्वरूप अनिर्वाच्य ॥ जेथें वाचा खुंटली ॥११५॥ ऐसियाचे धरितां पाय ॥ कळे आत्मयाची सोय ॥ अज्ञान निरसोनी जाय ॥ कृपेकरूनी ॥११६॥ सद्गुरु थोर वल्ली ॥ अनिर्वाच्या बोलवी ॥ दाखवी ब्रह्मज्ञानाची किल्ली ॥ तोचि स्वामी ॥११७॥ सद्गुरु स्वामी निजाचा ॥ ठाव दाखवी देवाचा ॥ बोलवी अनिर्वाच्य वाचा ॥ मुकपणें ॥११८॥ घेतां सद्गुरुची चरणधुळी ॥ घडे सर्व तिर्थांची मंडळी ॥ लागतां श्रीगुरुचे चरणकमळी ॥ वस्तु मोकळी देखावया ॥११९॥ लागे देखण्यापरी ॥ परी ते देखोनी टाळी ॥ चुके जन्ममरणाची पाळी ॥ सद्गुरुचेनि उपदेशें ॥१२०॥ जेथे प्राप्तीस पोहोचावे ॥ तेथें सेवेसी कां चुकावे ॥ सर्वस्वे अर्पावें ॥ सद्गुरुदक्षिणेसी ॥१२१॥ श्रीगुरु पूर्ण प्रतापी ॥ शिष्याते निजपदी स्थापी ॥ समाधी लागे सोपी ॥ जयाचेनि कृपें ॥१२२॥ सद्गुरु देवाचाही देव ॥ दाखवी निजाचा निजठाव ॥ जेणें समाधीसुख पावे ॥ अखंड समाधी





॥१२३॥ जे लागती सद्गुरुपदी ॥ ते जन्मासि न येती कधी ॥ भोगिती सहज समाधी ॥ श्रीगुरुबळें ॥१२४॥ सद्गुरु हाचि मातापिता ॥ प्रसन्न करावी आत्मदेवता ॥ समाधीत सुख होतां ॥ समता स्वामीबळे ॥१२५॥ सद्गुरु पुण्यराशी ॥ सोडवी सकळ जीवाशीं ॥ ब्रह्मपदाचा निवासी ॥ तोचि एक ॥१२६॥ सद्गुरु देवा समर्था ॥ तुजविण ठाव नाहीं रिता ॥ लावी मोक्षाच्या पंथा ॥ आलिया वाटे ॥१२७॥ सद्गुरुराज माउली ॥ अक्षय सिद्धीची साउली ॥ एकरूप हातासी आली ॥ निजबळें ॥ १२८॥ आतां सद्गुरुराज म्हणती ॥ सांगेन साधनाची गति ॥ अभय असावे संती ॥ मज बोलावया ॥१२९॥ तें नव्हें आसन मुद्रापाट ॥ षट्चक्राची पवनवाट ॥ तूर्या अथवा गोल्हाट ॥ तरी तेंही नव्हे ॥१३०॥ आसन घालोनि साधिती समाधी ॥ पवन हिंडती सांदोसांदी ॥ लुब्धले अनुहाताचे नादीं ॥ तरी तेंही नव्हें ॥१३१॥ आधारचक्री देऊनी दाटा ॥ पवन फिरविती उफराटा ॥ रुंदऊनी इंद्रियाच्या वाटा ॥ तरी तेंही नव्हे ॥१३२॥ दशवे द्वारी पवन कोंडोनी ॥ उठविती अनुहाताची ध्वनी ॥ सतरावी अथवा उन्मनी ॥ आत्मकला न जाय ॥१३३॥ बावन मातृकांचा मेळा ॥ शेजी लाविती इडापिंगळा ॥ बारा अथवा सोळा ॥ तरी तेही नव्हे ॥१३४॥ बैसोनियां एकांती ॥ एक नासिकी लक्ष्य लक्षिती ॥ भूमंडळ भेदोनिया जाती ॥ तरी तेंही नव्हे ॥१३५॥ षट्चक्रांची

दैवतें ॥ आराधुनी नाना भूतें ॥ ओळखी जीवशिवाते ॥ तरी तेंही नव्हे ॥१३६॥ लावोनी नेत्राचें कपाट ॥ वरते ठेविती दशांगुळांचे ताट ॥ नेत्री उठविती लखलखाट ॥ तरी तेंही नव्हे ॥१३७॥ छत्तीस तत्वांचा करूनि कर्दम ॥ मीनमार्गे चालविती दम ॥ पिपीलिका अथवा विहंगम ॥ तरी तेंही नव्हें ॥१३८॥ एकी करूनी लिंगदेह चारीहि न्यास ॥ जरी छाया पुरुषी झाला भास ॥ वैकुंठ अथवा कैलास ॥ आत्मकला न जाये ॥१३९॥ एक मुरकुंड मारुनी ॥ बैसती मानसपूजेचे ध्यानी ॥ पडिले नाना साधनी ॥ तरी तेही नव्हे ॥१४०॥ एक लक्षिती सुवर्णाचा चूर ॥ एक दाविती महाशेषाकार ॥ नाना बिंबे अपार ॥ तरी तेही नव्हे ॥१४१॥ स्थुल सुक्ष्म कारण ॥ परा पश्यंति मध्यमाकरून ॥ चहू मुद्रांचे साधन ॥ तरी आत्मकला न जाय ॥१४२॥ औठ पिठ गोल्हाट ब्रह्मरंध्र कपाट ॥ भ्रमरगुंफेचे महाबेट ॥ तरी तेंही नव्हे ॥१४३॥ पारायण झाले चारी वेद ॥ नाना शास्त्री विवाद ॥ झालिया सिद्धी साध्य ॥ तेरी तेंही नव्हे ॥१४४॥ समीपी नाही समीपता ॥ स्वरूपी नाही स्वरूपता ॥ जेथें सर्व सायुज्यता ॥ चारी मुक्ती त्याही नव्हे ॥१४५॥ काळ आलिया हातां ॥ सर्वांवरी चाले सत्ता ॥ वश्य झालिया सकळ देवता ॥ तरी तेंही नव्हे ॥१४६॥ एक चुकविती काळाची पाळी ॥ कित्येक दिवस बैसले लाऊनि टाळी ॥ आसन फिरविती अंतराळी ॥ तरी तेंही नव्हे ॥१४७॥ भूत-भविष्याची





करिती गणना ॥ एक रिघाले महा घोर वना ॥ करिती हठयोग साधना ॥ तरी तेंही नव्हे ॥१४८॥ तापसी तपसी तप ॥ नाना मंत्राचे जपती जप ॥ जरी देहाचा केला लोप ॥ तरी तेंही नव्हे ॥१४९॥ होम हवनादि जप ॥ केलें गाढ अंधारी तप ॥ शरीर केलें जरी गुप्त ॥ तरी तेंही नव्हे ॥१५०॥ अध: शून्य ऊर्ध्व शून्य ॥ महदा शून्य महा शून्य ॥ पाप अथवा पुण्य ॥ तरी तेंही नव्हे ॥१५१॥ साऱ्या ॐकार मातृका ॥ शास्त्र अर्थ करिवी निका ॥ प्राप्त झाले वैकुंठसुखा ॥ तरी तेंही नव्हे ॥१५२॥ एक बैसोनि तळवटी तळी ॥ आसन घालोनी महाजपाते चाळी ॥ स्नान संध्या त्रिवेळी ॥ तरी तेंही नव्हे ॥१५३॥ एक नाभिक मळापासूनी ॥रेचक कुंभक त्राहाटिक पवनीं ॥ मुद्रा लाऊनि बैसती ध्यानी ॥ तरी तेंही नव्हें ॥१५४॥ एक जाऊनि पाताळा ॥ सांगती शिष्यादिक सोहळा ॥ फिरऊनि महाकाळा ॥ तरी आत्मकला नव जाय ॥ १५५॥ पदरी करूनि पुण्याची गांठी ॥ किती दिवस बसले वैकुंठी ॥ इंद्र चंद्र इंद्रपदी ॥ आत्मा कळला नवजाय ॥१५६॥ ब्रह्मा विष्णु महेश ॥ आराधुनि केले वश ॥ कोटी वरुषें आयुष्य ॥ तरी तेंही नव्हे ॥१५७॥ नाना देवतांची करूनि पूजा ॥ प्रसन्न केली भवानी सारजा ॥ वश्य केला भूमंडळीचा राजा ॥ तरी तेंही नव्हे ॥१५८॥ एकीं आकर्षून काम ॥ शरीर करूनि अति सूक्ष्म ॥ कोंडूनि इंद्रिय अथवा दम ॥ तरी तेंही नव्हे ॥१५९॥

एक रिघाले महां घोरांदर वना ॥ बैसले तटस्थ लाऊनि ध्याना ॥ लक्ष्य लक्षिती देहींच्या ठाणमना ॥ तरी तेंही नव्हे ॥१६०॥ साधिता महाप्रवेश परकाया ॥ जरी आच्छादिली आपली निजच्छाया ॥ पडती योगी नाना साधन उपाया ॥ तरी तेंही नव्हें ॥१६१॥ एक जावूनि पाताळी ॥ प्रसन्न केली महाकाली ॥ झोटिंग वेताळ खेळविती खेळी ॥ तरी आत्मा कळला नवजाय ॥१६२॥ एकी करूनि अनुष्ठानें ॥ नाना मंत्रांची साधनें ॥ करूनि आकाशपंथी गमनें ॥ तरी तेंही नव्हे ॥१६३॥ एक जावूनि जळाभीतरी ॥ जळदेवता भोगिती अघोरी ॥ भूतें खेळविती महाखेळी ॥ तरी तेंही नव्हे ॥१६४॥ येकीं घेवुनि जपाची माळ ॥ विघ्नांते करी टाळाटाळ ॥ जरी उभा केला महाकाळ ॥ तरी तेंही नव्हे ॥१६५॥ एकी वाहिलें श्रीकमळ ॥ महा तपाचेनि बळें ॥ हालविले इंद्राचे इंद्रपद अढळ ॥ तरी तेंही नव्हे ॥१६६॥ एकीं शरीर घातले कर्वतखर्गी ॥ जावूनि बैसले वैकुंठ स्वर्गी ॥ अप्सरा भोगिती महादुर्गी ॥ तरी तेंही नव्हे ॥१६७॥ एक उठविती मेला मुरदा ॥ शक्ति उपासना करी लावूनि पडद्दा ॥ एकीं त्यजिला संसाराचा हडदा ॥ तरी तेंही नव्हे ॥१६८॥ यांत गोरखाची खूण ॥ मज करावी निरोपण ॥ जेणें हा होईजे धन्य धन्य ॥ इहलोकी ॥१६९॥ घन घनवटलें ॥ पाठी पोटीं दाटलें ॥ दरीं खोरीं साठवलें आत्मरूप ॥१७०॥ अरूप रूपें दाटली दाटी ॥ इंद्रिये कोंदली





लहान मोठी ॥ उभें सर्वांचे शेवटीं ॥ ते आत्मरूप ॥१७१॥ जेंथे न चालती उपचार ॥ नाना मंत्रांचे भार ॥ वेदशास्त्रे अपार ॥ न चालती आत्मरूपी ॥१७२॥ लाधलों अध्यात्मचर्चेच्या विचारा ॥ ध्यानीं मनीं देवच दिसे सारा ॥ देवाचा न कळे पारावार ॥ काय म्हणोनी ॥१७३॥ हातें पायें देवचि वारी ॥ घेतां देतां देवचि हारी ॥ आरता परता देवचि सारी ॥ भाग्य मोठें ॥१७४॥ निरामय निरक्षर कोरें ॥ नेणों सन्मुख अथवा पाठमोरें ॥ नेणति वेदशास्त्रे थोरथोरें ॥ पडिली महा भुली ॥१७५॥ वस्तु मागें पुढे ॥ वस्तु उभी चहूंकडे ॥ नेणती बापुढी मूढें ॥ ऐशिया वस्तूसी ॥१७६॥ मी कोण हा नेणें ॥ आलो कोठून कोठें जाणें ॥ आपुलिया उगमातें मूर्ख नेणे ॥ अज्ञानपणें ॥१७७॥ मी मजसी चुकलों ॥ आत्मसुखासी मुकलों ॥ संतसेवेशी अंतरलो ॥ पडली चुकीं ॥१७८॥ वस्तूचा कैसा सांठवला सांठ ॥ वस्तूसीं नाही पाठपोट ॥ वस्तु घनवटली घनदाट ॥ न कळे सीमा ॥१७९॥ वस्तु येकली येक ॥ नाहीं उणी अथवा अधिक ॥ तेथें वेद झाले मूक ॥ पार न कळे ॥१८०॥ वस्तूसी नाहीं सीमा ॥ वस्तु सर्वांचा आत्मा ॥ आत्मचर्चेच्या अध्यात्मा ॥ पूर्णकरी ॥१८१॥ वस्तूसी लागली टाळी ॥ वस्तु सर्वांते चाळीं ॥ उभी असे आळोआळीं ॥ नवल चोज ॥१८२॥ वस्तु सदा संचली ॥ जेथें तेथें दाटली ॥ पाठीपोटीं घनवटली ॥ पार न कळे ॥१८३॥ वस्तु ज्ञान अपरोक्ष ॥ सर्वादि

सर्वसाक्ष ॥ यासी बोलिजे मोक्ष ॥ वेदशास्त्री ॥ १८४॥ वस्तु सदां मोकळी ॥ आकाश फोडोनि जाय अंतराळी ॥ कां स्थिर स्थिरांवे पाताळी ॥ न कळे मज ॥१८५॥ वस्तु समसमान ॥ वेदशास्त्रांचे न चलें गमन ॥ ऐंसी कित्येक पुराणें ॥ कष्टताती ॥१८६॥ वस्तु अचळ ठिकाणी ॥ कोंदली सर्वांचे नयनीं ॥ उभी माझे आंगणी ॥ दयाळुत्वे ॥१८७॥ वस्तु आंगी नाहीं दिवस रातीं ॥ वस्तु सर्वांते पाहाती ॥ तेथें रिघावा केला संतमहंती ॥ कृपाबळें ॥१८८॥ वस्तु निर्मळ अति सोज्वळ ॥ जेथें पहाते पाहाणे निर्मळ ॥ माझे वर्म मज आकळे ॥ सद्गुरुकृपें ॥१८९॥ जेथें नाहीं कांही रंगादि रंग ॥ रूपावीण उभे अभंग ॥ संगसोडूनिया निःसंग ॥ कैसा असे ॥१९०॥ जेथें रूप ना रेखा ॥ वर्ण व्यक्तिविणे देखणें देखा ॥ बरें जिवी धरोनी आत्मसुखा ॥ पार व्हावें ॥१९१॥ वस्तु सनमुख सदा ॥ निजमुद्रा चळेना कदा ॥ लागलें अजपाचे छंदा ॥ जपाविण ॥१९२॥ रूपरेखा नसे वस्तूसी ॥ व्यापक जाण सर्वांसी ॥ उभी चिन्मय कणाची रासी ॥ ढिसाळपणें ॥१९३॥ वस्तु नाहीं काया ॥ वस्तूसी नाहीं छाया ॥ वस्तूसी नाहीं माया ॥ निरामय तें ॥१९४॥ तूर्तबोधग्रंथ निर्माण करावा ॥ ऐसी इच्छा झालीं तव कृपेने देवा ॥ तोची बोलवी कवित्वा ॥ दीन हैबतीचेनि मुखें ॥१९५॥ सद्गुरुसमर्था कीजे ॥ म्यां आत्मत्व देखिजे ॥ महां सुखाते पाविजे ॥ सद्गुरुचेनि बळें ॥१९६॥ सद्गुरुचेनि अंजनें





॥ दिसों लागे साझे निजधन ॥ घटमठी ठेविलें सांठवून ॥ तेथें चोराचे भय नाही ॥१९७॥ सद्गुरु कृपासागर ॥ पर वस्तूंचा सौदागर ॥ अलक्ष केलें अपार ॥ भरले तारूं ॥१९८॥ सद्गुरुची करणी अगोचर ॥ देहीं होय वस्तूचा चमत्कार ॥ देखणें दाखवी सारासार ॥ दीनदयाळ ॥१९९॥ उंच ना ठेंगणें ॥ जुनाट ते जुनें ॥ निरामय निर्गुण ॥ परब्रह्म ॥२००॥ धरूं जातां हाता नये ॥ पाहूं जातां नयनांचा नयनही होये ॥ भेटूं जातां भेटीचि न कळे सोय ॥ नवल कैसें ॥२०१॥ सद्गुरुसी शरण जावें ॥ तुझे वर्म तुजला होईल ठावें ॥ आतां कांही नाही तेचिं व्हावें ॥ निश्चयेसी ॥२०२॥ दृष्टी न पडें ते देखावें ॥ अगोचर संतांते पुसावें ॥ खरे करूनि पदरी घ्यावें ॥ गुरुपुत्रीं ॥२०३॥ आसपास दास चाल चाले ॥ कांही नाहीं तें घन दाटलें ॥ व्यापकपणे व्यापिले ॥ सर्वांसर्वी ॥२०४॥ निर्गुण हें आकारलें ॥ सगुण निर्गुण एक झाले ॥ पाहाते पाहाणे विरोन गेलें ॥ सहज स्वरूपी ॥२०५॥ वस्तु खोल किंवा उथळ ॥ किंवा वाहते जळ निर्मळ ॥ अवघेंचि तारूं अढळ ॥ तारावया ॥२०६॥ वस्तु जिवींची कळा जिवीं ॥ लाउनी ज्ञानाची ठाणदिवी ॥ अगोचर नयनीं दाखवी ॥ सद्गुरु जो ॥२०७॥ धावो घालितां न काटे ॥ महाखड्गी न तुटे ॥ फोडूं जातां न फुटे ॥ अक्षय जें ॥२०८॥ या वस्तूसी नाहीं आकार ॥ देखणें दृष्टीसी तेथे कैंसा थार ॥ मन तेथें कैसा करी विचार ॥ न कळे वारे

॥२०९॥ वस्तु हे साकारली ॥ वस्तु उभी भोवताली ॥ निजात्म खूण हातासी आली ॥ सद्गुरुकृपे ॥२१०॥ सद्गुरु तारक मोठा ॥ उघडी ब्रह्मपदाच्या कपाटा ॥ करितो मोकळ्या मुक्तीच्या वाटा ॥ समर्थ जो ॥२११॥ वस्तूसी नाहीं काया ॥ वस्तूसी नाहीं माया ॥ वस्तूसी नाहीं छाया ॥ निरामय तें ॥२१२॥ वस्तुमध्यें यावें ॥ वस्तुमध्ये जावें ॥ वस्तुपोटीं रिघावें ॥ संतसज्जनी ॥२१३॥ वस्तुसमान समता ॥ कोठें ठाव नाहीं रिता ॥ मनाची मिटे ममता ॥ सद्गुरुकृपे ॥२१४॥ वस्तु सर्वांहूनि वेगळी ॥ मिळेना कल्पनाचेनि मेळी ॥ कोठें उणी अथवा आगळी ॥ दिसेना ॥२१५॥ वस्तु नाहीं कशासारखी ॥ कोण मिळेना इचा पारखी ॥ सद्गुरु दयाळ थोर कीं ॥ दावी निजडोळां ॥२१६॥ गुप्त धन गुप्त घेऊं ॥ जुनें ठेवणें कोठें ठेऊं ॥ पारख आतां कोणासी दाऊं ॥ पारखी मिळेना ॥२१७॥ वस्तूचा कळेना पारू ॥ वस्तु सर्वांचा सारू ॥ वस्तु नाहीं विचारूं ॥ न कळे कोणा ॥२१८॥ अरूपाचे रूप कैसें देखावें ॥ अलक्ष्यासि लक्ष्य कैसें लावावें ॥ अनामाचे नाम कैसे घ्यावें ॥ न कळे मज ॥२१९॥ अनाम अनामय ॥ त्याचे कोठे धरावे पाय ॥ पूजा उपचार न साहे ॥ तेथें कांही ॥२२०॥ वस्तु देखणी कळा ॥ वस्तु सर्वांचा जिव्हाळा ॥ कोण खेळे तिचीया खेळा ॥ पार न कळे ॥२२१॥ कोण दाखवी गुप्त धना ॥ लागों साधु संताचिया चरणा ॥ जेव्हां येईल त्यांचे ध्याना ॥ तेणें लाभे





॥२२२॥ ब्रह्म कोठें माईना ॥ अधिक उणे होईना ॥ दृष्टीपुढे कोंदले जाईना ॥ अचळ जे ॥२२३॥ वस्तु परेपरती प्रकट ॥ दिसे मुक्तीची मोकळी वाट ॥ गुप्त धनाचा साठलां साठं ॥ भाग्य मोठें ॥२२४॥ वस्तु ध्यावीं अमोल मोली ॥ बोलती अबोल बोलीं ॥ वस्तु ठेवावी महा खोलीं ॥ निजनयनीं सांठऊनी ॥॥२२५॥ वस्तूचा परेपरता पार ॥ न कळे गुप्त गोचर विचार ॥ खोलावें मुक्तीचें दशवें द्वार ॥ झळझळीत दिसे ॥२२६॥ वस्तु पाहता समान समता ॥ कोठें ठाव नाहीं रिता ॥ आपुलिया मुळा जातां ॥ देवचि दिसे ॥२२७॥ माझे नयनी भरला श्रीरंग ॥ कांही नेणे ते समाधीचे आंग ॥ सहज समाधी अचळ अभंग ॥ समाधि सुख मोठें ॥२२८॥ नयना परता नयन सांठला ॥ सर्वांगी थोर नयन दाटला ॥ तो नयन कोणासी नाही चुकला ॥ देखणा सर्वांचा ॥२२९॥ वस्तु ठाव कोणासी दिसेना ॥ वस्तु आभास कोणास भासेना ॥ वस्तु मूर्खांसी दिसेना ॥ कदा काळीं ॥२३०॥ ब्रह्म उभें उगवले ॥ ब्रह्म सर्वांसी चुकलें ॥ ब्रह्म न कळे शास्त्र बोले ॥ ते सद्गुरु दाखवी ॥२३१॥ या आत्मसुखा कौतुका ॥ थोर पडिला चुका ॥ जेथें वेद झाला मुका ॥ तें न कळे कीं ॥२३२॥ वस्तु गुप्त ध्यावी ॥ वस्तु गुप्त द्यावी ॥ वस्तु गुप्त प्रकटवावी ॥ संतमंहती ॥२३३॥ वस्तु वारियाने उडेना ॥ पाण्यांत घातल्या बुडेना ॥ अग्नीसी लावितां जळेना ॥ अक्षय जें ॥२३४॥ वस्तु

जन्मली नाहीं कोणापोटीं ॥ स्थूल सूक्ष्म अथवा लहान मोठी ॥ सद्गुरु दावी निजदृष्टी ॥ निज ओंठी करूनियां ॥२३५॥ वस्तूसी नाही जन्म घेणे ॥ चौऱ्यांशी लक्ष फिरतेपणें ॥ ल्यावें अक्षय पदाचें लेणें ॥ संत मुनी सांभाळती ॥२३६॥ वस्तु जुनाट जुनी ॥ कोठें नाहीं अधिक उणी ॥ दाटली सगुणरूपा निर्गुणी ॥ सीमा नाही ॥२३७॥ व्यास ऋषींचे उच्छिष्ट ॥ मज बोलावया नांही कष्ट ॥ तूर्तबोधीं गुज सांगितले स्पष्ट ॥ सद्गुरुकृपे ॥२३८॥ दत्तात्रेय महामुनी ॥ समाधिस्त निर्गुणी ॥ मुद्रा लागली जुनाट जुनी ॥ अक्षयपदी ॥२३९॥ शुक महायोगी ॥ जुनाट आद्य जोगी ॥ अचळपद भोगी ॥ सहज समाधि ॥२४०॥ मच्छिंद्रनाथ संसार शोधीं ॥ हेची वस्तु गोरखराज बोधी ॥ हेची वस्तु जिवी धरूनि खरी ॥ पार जाहला ॥२४१॥ श्रीशंकर महादेवे ॥ देहापरते गुज करवे ॥ पार्वतीसी केले ठावें ॥ जग तारावया ॥२४२॥ श्रीशंकराचे पदीं ॥ पार्वतीसी लागली समाधी ॥ तुटली जन्ममरणाची व्याधी ॥ येणें न कळे पैं ॥२४३॥ अर्जुनाच्या निजहिता ॥ कृष्णदेव उपदेशी गीता ॥ हे वस्तु बोधावी अर्जुनाचे चित्ता ॥ जन्ममरण खंडावया ॥२४४॥ कृष्णदेवें थोर केलें कवाड ॥ हेचि वस्तु बोधवी निजनिवाड ॥ उघडोनि महामुक्तीचे कवाड ॥ स्वरूप दाखवी ॥२४५॥ कृष्णदेवें अक्षय रथ पेलिला ॥ महाभारती त्वरेंसा उपदेश केला ॥ अर्जुन महाबळी स्वप्नीं जागा





झाला ॥ तों भोवता हरि दिसे ॥२४६॥ प्रसन्न झाला वनमाळी ॥ अर्जुनाची चुकविली जन्मपाळी ॥ स्वरूपी लाऊनियां टाळी ॥ जो राजयोग करवी ॥२४७॥ कृष्णरूप सांठउनि डोळा ॥ अर्जुन सहजची मोकळा ॥ भोगी सहज समाधि सोहळा ॥ जन्म तुटे स्वभावें ॥२४८॥ अर्जुन ज्ञानी सारा ॥ पुसे आत्मचर्चेच्या विचारा ॥ गुप्त झाले थोर थोरां ॥ ते काय असे ॥२४९॥ श्रीकृष्ण म्हणे रे अर्जुना ॥ त्वां पुसिलें आध्यात्मज्ञाना ॥ परी तो आत्मा नसे अधिक उणा ॥ सर्वास समानसा दिसे ॥२५०॥ कृष्ण साधूंचा साधक ॥ अर्जुना दावी नवल कौतुक ॥ समाधीचे महासुख ॥ यथा विधि निरूपिले ॥२५१॥कृष्ण परमात्मा परब्रह्म ॥ उद्धवासी निरूपिले निजवर्म ॥ हरलें जन्माचे जन्मकर्म ॥ उद्धव केला पैं ॥२५२॥ जाणोनी उद्धवाच्या भावा ॥ कळवळा आला कृष्णदेवा ॥ भागवती सांगितला निजठेवा ॥ जग तारावया ॥२५३॥ उद्धव बोले आध्यात्माची मात ॥ कृष्ण सांगे सिद्धांचा सिद्धांत ॥ वस्तु देखावी निजनयनी एकांत ॥ गुप्तरूपें ॥२५४॥ गुप्त गोचर काय असे ॥ उद्धव निजहितालागीं पुसे ॥ अरूपाची कैसी मुस ॥ सांगा स्वामी ॥२५५॥ अरूप तोची आत्मा ॥ सकळ जिवांचा परमात्मा ॥ आत्मचर्चेच्या अध्यात्मा ॥ प्रकट करी ॥२५६॥ दत्त गोरख देव ॥ हाची बोलिजे अनुभव ॥ सकळ ऋषी आणि महादेव ॥ खूण वाणे सकळशास्त्री ॥२५७॥ जालंद्रिनाथ थोर फकीर ॥

लिदीजासि केलें समाधिविवर ॥ समाधि दाटली आंत बाहेर ॥ थोर योपी ॥२५८॥ कैवाड केला मुकुंदराजे ॥ जैतपाळासी उपदेशिले निजगुज ॥ सिंधुमाजी प्रकट केलें वस्तुबीज ॥ जग तारावया ॥२५९॥ नानका देवें थोर केली कृपा ॥ प्रकट केलें निजरूपा ॥ आणि समाधीच्या सुख स्वरूपा ॥ प्रकट केलें ॥२६०॥ गोरखनाथ आणि चर्पट ॥ हाची अनुभव बोलिले निरंजन निपट ॥ शिष्या करूनि अपार खटपट ॥ समाधी अचाट भोगावी ॥२६१॥ सकळऋषी आणि मुनी ॥ राजर्षी अध्यात्मगुणी ॥ म्हणती हेची वस्तु जुनाट जुनी ॥ ओळखावी ॥२६२॥ सकळ सिद्धांचा एक विचार ॥ हाची अनुभव केला साचार ॥ वस्तु अपरोक्ष अपार ॥ जाणवेना ॥२६३॥ चंद्र आत्मा कैसा म्हणावा ॥ सूर्य तो जगासि ठावा ॥ आत्मा गुप्त ठेविला ठेवा ॥ गुप्त धन सर्वांचे ॥२६४॥ आकाश आत्मा केला न जाय ॥ पवन आत्मा कैसेनि होय ॥ सुचवी मुळींची सोय ॥ यथासुखें ॥२६५॥ आत्मा नव्हे धरत्रीसार ॥ आत्मा नव्हे जळबिंदु विचार ॥ आत्मा नव्हे वनस्पती भार ॥ सहज समाधी नेणवे ॥२६६॥ आत्मा नव्हे जळबिंदु विचार ॥ आत्मा नव्हे मेरु मांदार ॥ आत्मा नव्हे देवताप्रकार ॥ आत्मखुणे तें वेगळी ॥२६७॥ आत्मा नव्हे ब्रह्मदेव ॥ आत्मा नव्हे जीवरूपें जीव ॥ आत्मा नव्हे सदाशिव ॥ पालनकर्ता अकर्ता ॥२६८॥ आत्मा नव्हे वैकुंठ कैलास ॥ आत्मा





नव्हे स्वर्गीचे सुखविलास ॥ आत्मा नव्हे अमृतपान अक्षयरस ॥ आत्मसुख नेणवे ॥२६९॥ आत्मा नव्हे निकट देहबुद्धी ॥ आत्मा नव्हे साधन उपाधी ॥ आत्मा नव्हे जीवशिव माया अनादि ॥ आत्मा नेमिला नव जाय ॥२७०॥ आत्मा नव्हे पूर्ण चारी वेद ॥ आत्मा नव्हे षट् शास्त्रांचा भेद ॥ आत्मा नव्हे पुराण वाव विवाद ॥ वाद घालितां ना कळे ॥२७१॥ आत्मा नव्हे जंगमशास्त्र ॥ आत्मा नव्हे निगम पवित्र ॥ आत्मा नव्हे चराचर विचित्र ॥ न कळे विचक्षणा ॥२७२॥ आत्मा नव्हे चंद्रतारा ॥ आत्मा नव्हे सिंधुवरा ॥ आत्मा नव्हे जगसारा ॥ आत्मा नेमिला नव जाय ॥२७३॥ आत्मा नव्हे योग याग ॥ आत्मा नव्हे तिर्थ प्रयाग ॥ आत्मा नव्हे एकादशी पुण्यमार्ग ॥ आत्मा पुण्यावेगळा ॥२७४॥ आत्मा नव्हे मुख्य गायत्री ॥ आत्मा नव्हे तुळसीपत्री ॥ आत्मा न कळे मंत्रतंत्री ॥ सद्गुरुविण ॥२७५॥ आत्मा नव्हे देवदेवी ॥ आत्मा नव्हे वैकुंठपदाची पदवी ॥ आत्मा नव्हे जीवनकळा सत्रावी ॥ आत्मा सर्वा अलिप्त ॥२७६॥ आत्मा नव्हे पृथ्वी आकार ॥ आत्मा नव्हे दृश्य साकार ॥ आत्मा नव्हे सर्वांचे सार ॥ न कळे कवणासी ॥२७७॥ आत्मा नव्हे मन बुद्धी ॥ आत्मा नव्हे नाना उपाधी ॥ आत्मा नव्हे पवनसिद्धी ॥ आत्मा उपाधिवेगळा ॥२७८॥ आत्मा नव्हे क्रिया कर्म मार्ग नीट ॥ आत्मा नव्हे साधन उपाधि खटपट ॥ आत्मा नव्हे हटयोग अचाट ॥ आत्मा योगासही निराळा

॥२७९॥ आत्मा नव्हे महाभारत ॥ आत्मा नव्हे धारातीर्थ ॥ आत्मा नव्हे मानवी राजा समर्थ ॥ आत्मा राज्यमदे . नातुडे ॥२८०॥ आत्मा नव्हे तीर्थकाशी ॥ आत्मा नव्हे वाराणी आत्मा सर्वतीर्थाचा निवासी ॥ न कळे कवणा ॥२८१॥ आत्मा नव्हे मातृका अकार ॥ आत्मा नव्हे मातृका उकार ॥ आत्मा नव्हे मातृका मकार ॥ आत्मा मातृका वेगळा ॥२८२॥ आत्मा नव्हे शेषासहित पाताळ ॥ आत्मा नव्हे एकवीस स्वर्गांची माळ ॥ आत्मा नव्हे संव्हार करिता काळ ॥ आत्मा काळासी कळेना ॥२८३॥ आत्मा नव्हे मूळपुरुष ॐकार ॥ आत्मा नव्हे चित् चैतन्यविकार ॥ आत्मा नव्हे त्रिपुटि का आकार ॥ आकारासी जो वेगळा ॥२८४॥ आत्मा नव्हे चिद्शक्ती ॥ आत्मा नव्हे प्रकृती ॥ आत्मा नव्हे सगुण प्राप्ती ॥ सगुण काळाचें खाजें ॥२८५॥ आत्मा नव्हे ध्वनी आवाज ॥ आत्मा नव्हे तत्वतेज ॥ आत्मा नव्हे अनादिबीज ॥ बीजाचा बीज लिंगदेह ॥२८६॥ आत्मा नव्हे नादबिंदु कळा ॥ आत्मा नव्हे ब्रह्मांड पुतळा ॥ आत्मा नव्हे वैराट लीळा ॥ वैराट परता पैं आत्मा ॥ २८७॥ आत्मा नव्हे स्थूल सूक्ष्म देह ॥ आत्मा कारण महाकारण कैसेनि होय ॥ लिंगदेह नासूनि जाय ॥ तैंसाच काय म्हणावे ॥२८८॥ आत्मा नव्हे भ्रमरगुंफेचे बेट ॥ आत्मा नव्हे षट्चक्राची वाट ॥ आत्मा नव्हे गोल्हाट ॥ आत्मा नाही सर्वांसी म्हणतां नये ॥२८९॥ आत्मा नव्हे पंचप्राण ॥ आत्मा नव्हे





रेचक कुंभक करून ॥ आत्मा नव्हे त्राहाटक उलट पवन ॥ आत्मा पवना वेगळा ॥२९०॥ आत्मा नव्हे जागृती ॥ आत्मा नव्हे सुषुप्ती ॥ आत्मा नव्हे गाढगूढ भ्रांती ॥ आत्मा अवस्थे वेगळा ॥ २९१॥ आत्मा नव्हे दशवें द्वार ॥ आत्मा नव्हे त्रिवेणीओघविचार ॥ आत्मा नव्हे जागृती उन्मनीसार ॥ आत्मा नांवरूपातीत ॥२९२॥ आत्मा नव्हे त्रिकूट कुंडलिनी ॥ आत्मा नव्हे तुर्या लोळणी ॥ आत्मा नव्हे महादेव भवानी ॥ आत्मा देवता परता पैं ॥२९३॥ आत्मा आकार आर्तवार ॥ आत्मा परेपरता पार ॥ आत्मा मध्यमधि हा विचार ॥ न कळे कवणा ॥२९४॥ आत्मा सिंधू पार असे ॥ आत्मा सिंधू वर वसे ॥ आत्मा सिंधूमाजी दिसे ॥ पूर्णपणें ॥२९५॥ आत्मा वायूचे शेवटी ॥ आत्मा पवनाचे मूळ देटीं ॥ आत्मया वायुस खेटाखेटी ॥ परी न कळे त्यातें ॥२९६॥ आत्मा आकाशापलीकडे पर्ता ॥ आत्मा आकाशा अलिकडे आर्ता ॥ आत्मा सर्वांसी पुरला पुर्ता ॥ पुरोनी उरला असे ॥२९७॥ आत्मा कैशासी म्हणावे ॥ हे कैसें होईल मजला ठावें ॥ अरूपाचे रूप कैसेनी देखावें ॥ न कळे अगोचर जाण ॥२९८॥ एक म्हणती आत्मा निघोनी गेला ॥ एक म्हणती प्राणी कैसैनि मेला ॥ प्रत्यक्ष जग कोणी उभा केला ॥ न कळे कोणासी ॥२९९॥ वरकड जागा काय खालीं केला ॥ मग असे ब्रह्मांडी सांठविला ॥ काय म्हणावे साधूच्या बोला ॥ आत्मा येत जात नाही ॥३००॥ अंतरीचे

निजधन करणें ॥ अपरोक्ष खरें नाणें ॥ खरे करुनी पदरी घेणें ॥ गुरुपुत्री ॥३०१॥ हें ढिसाळ मज कैसें चोरिले ॥ दृष्टी देखावया नाहीं उरले ॥ जे रूप सर्वासी पुरलें ॥ ते काय असे ॥३०२॥ घटीमठीचा आत्मा सारा आणोनी ॥ मग काय सांठविला त्रिकूट भुवनीं ॥ जग चाळवितो कवण धनीं ॥ आत्मा जेथींचा तेथें ॥३०३॥ एक म्हणता देव देव्हारीच असे ॥ वरकड जागा काय देव नसे ॥ घर भरोनी घरांत वसे ॥ तो देव न कळे कवणा ॥३०४॥ वरकड जागा काय खाली करावा ॥ मग आत्मा दशवेद्वारी न्यावा ॥ आत्मयांचा ठाव कोणा नाहीं ठाया ॥ पडिली भुली ॥३०५॥ आत्मा अवघा सांठविला ब्रह्मांडी ॥ मग व्यापक कोण खंडोखंडी ॥ एकदेशी भविती मुर्ख पाखांडी ॥ सहज सुख नेणवे ॥३०६॥ आत्मयाची तों दाटली असे दाटी ॥ मन काय नेती भ्रमर गुंफेचे बेटीं ॥ या योगाभ्यासाचे शेवटीं ॥ काय पहाती ते न कळे ॥३०७॥ वरकड जागा करूनिया रिकामा ॥ मग कोठें सांठविता आत्मया रामा ॥ चळ नाहीं आत्मया अनाम नामा ॥ तया उठाठेवी कैंची ॥३०८॥ घटमठीचा आत्मा कोठोनी आणावा ॥ मग काय ब्रह्मांडी नेऊन सांठवावा ॥ वरकड जागीं काय आत्मा नाहीं म्हणावा ॥ हें तो मिथ्या असे ॥३०९॥ आत्मा सारा योगबळें ब्रह्मांडी सांठविती ॥ मग घट मठकी काय पडतील रितीं ॥ मग आत्मा कैचा चाळक सर्वा भूती ॥ आत्मया येणें जाणें पैं नसे





॥३१०॥ घटमठींचा आत्मा सकट सारा ॥ मग कोण चालवी नारीनरा ॥ आत्मया नाहीं येरझारा ॥ आत्मया पार नसे पैं ॥३११॥ अभ्यास करी पवनाचा ॥ पवन आत्मा नोहे साचा ॥ अक्षय धरणी या जीवाचा ॥ तो न कळे ॥३१२॥ आत्मया कोंडुनी आत्मया चुकीं ॥ जन्ममरण भोगी कौतुकी ॥ न चुके आत्मयाचे कांही चुकीं ॥ आत्मा अनादि अक्षय ॥३१३॥ आत्मा कोंडिता न कोंडे ॥ आत्मा सांडिता न सांडे ॥ आत्मा जेथील तेथें उदंडे ॥ उदंडा उदंड तुळेंना ॥३१४॥ आत्मा अभ्यासें कोण चढवी उतरी ॥ आत्मा जेथील तेथेंची भरला सरोवरीं ॥ आत्मा न्यावा आणावा कोठें लावावी सूत्रदोरी ॥ चित्त दोरीसी न सापडे ॥३१५॥ ऐंशीया अभ्यासाचे काय घ्यावें ॥ अमौल्य वस्तुसि मुकावें ॥ गुप्तधन कैंसे होईल ठावें ॥ धनाची धनाशा मोठी ॥३१६॥ सद्गुरु स्वामीचेनि उजेडे ॥ नाना साधनीं देव सांपडे ॥ निधान दिसों लागे उघडें ॥ सद्गुरुकृपेचेनि बळें ॥३१७॥ देव वसे थोर देवाचे देऊळीं ॥ मग काय नाहीं डोंगरी आणि माळीं ॥ सर्व भूतांते कोण चाळी ॥ देव सर्वां ठायी असें ॥३१८॥ पंढरीनाथें बसावें पंढरपुरी ॥ वरकड नगरें काय ओस सारीं ॥ कोण चालवितो नरनारी ॥ देव वसे सर्वार्थी ॥३१९॥ देव वसे देवळाचे ठाई ॥ वरकड जागी काय विठोबा नाहीं ॥ कोण बोलवी घटमठ देहीं ॥ देव सर्व व्यापक ॥३२०॥ देव वसे वैकुंठ भुवनासी

॥ मग काय नाहीं पाताळीं व आकाशीं ॥ कोण व्यापक सर्वाभूती सर्वासी ॥ देव जेथे तेथे असे ॥३२१॥ देव असे वैकुंठ शिखरीं ॥ मग काय नाहीं पंढरपुरीं ॥ देव भरला असे घरोघरी ॥ तो देव कळे न कवणा ॥३२२॥ राम वसे रामेश्वरी ॥ मग काय राम नाहीं सर्वां अंतरी ॥ रामरूप कोंदले आंत बाहेरी ॥ राम सर्वा ठाई असे ॥३२३॥ देव द्वारकेसी म्हणोनी जावें ॥ देहीच्या देवा कोणी पूजावें ॥ देवपूजेंचे वर्म कोणा न ठावे ॥ देव व्यापक तो न कळे ॥३२४॥ देव वसे सोवळ्याचे ठायी ॥ देव काय ओंवळ्यात नाही ॥ कोण हालवितो सकळ कळा देहीं ॥ तो मज न कळे हो ॥३२५॥ नेणोनियां आपल्या निजगुजहिता ॥ घरोघरी देवपूजा बहुता ॥ देवाधि देव सर्वापरता ॥ तो न ओळखेचि कोणी ॥३२६॥ जेथें सार्थक होय जन्ममरणाचें ॥ तेथें सेवेसी चुकावें कैचें ॥ नाहीं मनीं आवंतणें घ्यावे काळाचें ॥ हेंची बरवे असे पैं ॥३२७॥ जेथें झाली थोर कार्यसिद्धी ॥ तेथें सेवेसीं चुकावें ही विपरीत बुद्धी ॥ मग पडावे काय काळाचे बंदी ॥ ऐशिया न भजे तो पापी ॥३२८॥ जेथें चुके जन्ममरणाचा घोर ॥ तेथें सेवेसीं कां व्हावे चोर ॥ न भजे तो पापी थोर ॥ नष्ट चांडाळ दुरात्मा ॥३२९॥ जेथें आत्मया दाखवी हे दृष्टी ॥ पुण्याच्या झाल्या कोट्यानुकोटी ॥ तयासि न भजावें काय शेवटीं ॥ न भजतां पाप मोठें ॥३३०॥ जेणें आत्मयासि दाखविलें ॥ महा प्राप्तीसी पोंहोंचविलें ॥ त्यासी





भजावें काय वहिलें ॥ अज्ञानपणें स्फुंदती ॥३३१॥ जेणें चुकविल्या जन्ममरणाच्या कोडी ॥ त्यासी न भजावें काय आवडीं ॥ आयुष्य जातसे लगबगा तांतडी ॥ सार्थक कैसे होईल ॥३३२॥ जो जन्ममरण चुकवी ॥ आत्मयासी धरोनी दाखवी ॥ ऐशिया न भजावें जीवीं ॥ तो जाय अधोगती ॥३३३॥ जो स्वामी चुकवी हा गर्भवास ॥ त्यासी न भजता जीवित्वाचा नाश ॥ नाना भजनीं करावें सायास ॥ सेवेलागीं ॥३३४॥ जो चुकवी जन्ममरणाचे दुःख ॥ त्यासी न भजतां कैसें होईल सुख ॥ वारंवार भजनीं न पडे चुक ॥ सच्छिष्य त्या नांव ॥३३५॥ जो चुकवी जन्ममरणाची पाळी ॥ नित्य समाधीतें लावी टाळी ॥ त्यासी न भजे तो पडे नर्कदिटाळीं ॥ सत्य जाण निश्चयें ॥३३६॥ जो चुकवी जन्ममरणाचे सांकडे ॥ देव दाखवी प्रकट मागें पुढें ॥ ऐशीया न भजती मतीमूढें ॥ त्यासी जांचणी पैं थोर ॥३३७॥ जो जन्ममरणापुनी सोडवी ॥ चुकला ठाव हा दाखवी ॥ जेथील तेथें नेंऊनी ठेवी ॥ त्यासीं काय न भजावें ॥३३८॥ जो चुकवी जन्ममरण ॥ आत्मयाची दाखवी खूण ॥ त्यासीं न भजतां पातकदुणें ॥ अकर्म लागलें पाठीसीं ॥३३९॥ जो जन्ममरणाचे सार्थक करी ॥ उभें रामरूप दाखवी अंतरी ॥ त्यासी न भजें तो पातकी अघोरी ॥ भजनीं आळशी सर्वदा ॥३४०॥ ज्याचेनि पार व्हावें ॥ त्यासी कैसे विसरावें ॥ नित्य भजनीं असावें ॥

सेंवेसी पैं ॥३४१॥ ऐशीयाचे सोडूनी पाय ॥ मग कोणता करावा उपाय ॥ अवघें आयुष्य सरोनि जाय ॥ मग करी धांवाधांवी ॥३४२॥ रामेश्वरीं वसे रामाचे स्वरूप ॥ वरकड जागीं काय नाहीं रामरूप ॥ जेथें तेथें उभे अमूप ॥ अनाम नामावेगळें ॥३४३॥ राम सर्वांठायीं सारखा ॥ दुसरा नसे पारखा ॥ परी या स्वानंदाच्या हरिखा ॥ भेटूं जातां पार न कळे ॥३४४॥ रामेश्वरी राम अपार भरला ॥ घटींमठीं भरोनि उरला ॥ राम सर्वांसी पुरला ॥ अधिक उणा नसेची ॥३४५॥ अंती महाप्रयाग तटीं ॥ देहींच्या रामा अपरोक्ष नाहीं भेटी ॥ राम भरला आकाशाचे पाठीं पोटीं ॥ तो राम न कळे कोणा ॥३४६॥ काय करावें जाऊनि महातीर्थी ॥ आत्मसुख नातुड या पदार्थी ॥ शिंणावें दोषाविण अर्थी ॥ कोण गोडवी मानवा ॥३४७॥ रामरूप दृष्टी थोर देखावया ॥ लागावे अजपा जपाच्या उपाया ॥ उगम शोधूनी मूळपाया ॥ जेणें देव केले पैं ॥३४८॥ देहींच्या रामा जों ओळख ॥ रामेश्वरी जाऊनी काय देख ॥ गेलें हातींचे मोठें सहजसुख ॥ राम कदापि न कळे ॥३४९॥ रामेश्वरी म्हणती साक्षात् राम आहे ॥ देहींच्या रामा कोणी न पाहे ॥ व्यर्थ गेलें निंदोनि देहे ॥ भुली पडली मानवां ॥३५०॥ रामेश्वरीं रामाचीं रामप्रभा ॥ मग योगियां ध्यानीं कोण उभा ॥ घेऊनी गोड रामरूपाची शोभा ॥ नवल कैंसे चोजवेना ॥३५१॥ रामेश्वरी रामरूप शुद्ध केणें ॥ निंद्य जागीं काय झाले





अशुद्धवाणें ॥ घटिमठीं साठविले खरे नाणें ॥ परी पारखीं मिळेना ॥३५२॥ देहींचा राम हा नाहीं ठाया ॥ म्हणती तिर्थी राम पूजावा ॥ रामाचा कैंसा लागेल सुगावा ॥ तिर्थी हिंडल्या न सांपडे ॥३५३॥ या देहींच्या रामा थोर चुकीं ॥ रामेश्वरीं जातो कौतुकी ॥ ज्या रामरुपी जगत्रय सुखी ॥ तो राम कळे कवणा ॥३५४॥ रामेश्वरीं हो राममहिमा ॥ घरोघरीं पूजितीं प्रतिमा ॥ रामरूपाची न कळे महिमा ॥ थोर चुकी पडली पैं ॥३५५॥ नेणोनी देहींच्या देवासी ॥ म्हणती चला जाऊं काशींसी ॥ काय म्हणावें परी तयापाशीं ॥ आत्मा असोनि न कळे हो ॥३५६॥ फिरे तिर्थी तीर्थवासी ॥ न कळे आत्मा पुण्यराशी ॥ बंधन केलिया जीवासी ॥ भ्रमणा मोठी ॥३५७॥ म्हणोनि आपल्या हितगुजा ॥ घरोघर होतसे देवपूजा ॥ देवपूजेवेगळा देवदुजा ॥ तो नेणती अज्ञानें ॥३५८॥ स्वामीच्या स्वामित्वा पूर्ण ठसावें ॥ मग स्वामिसेंवेसी कां चुकावें ॥ दास्य दास्यत्व तयांचे करावें ॥ जन्मोजन्मी ॥३५९॥ एक भजती भवानी ॥ कंठी वाहे मायाराणी ॥ येणें आत्मा कैसा पडे ठिकाणी ॥ भक्ति केल्या कोण काजा ॥३६०॥ श्रीकृष्ण कथा न आवडे ॥ प्रपंच गोंधळ घाली रोकडे ॥ आत्म सुखाविण येरीकडे ॥ चारी दिशा कवळिती ॥३६१॥ एकादशी सोमवार नावडे ॥ मंगळ शनिवार प्रीतिने आवडे ॥ बुधवार गुरुवार आत्मा नातुडे ॥ श्रम केल्या कोण काज ॥३६२॥ ऐशा उपवासे केवीं

चुके संसार ॥ न कळे आत्म्याचा विचार ॥ पाठीं लागला काळ चोर ॥ रांत्रंदिन न विसंबे ॥३६३॥ माथा प्रपंचाचे भेदे ॥ मायेपुढे नाचे विनोदे ॥ त्यासी केवी तारावे गोविंदे ॥ प्रचंड डोही बुडाला ॥३६४॥ कित्येक झाले अज्ञानरोगी ॥ आत्मा न कळे कटकट वाउगी ॥ कित्येक झाले वैताल जोगी ॥ पोटासाठी हिंडती ॥३६५॥ जनादेखतां जन भुलले ॥ जनादेखतां जन मेले ॥ एक देखतां एक गेले ॥ काळमुखीं ॥३६६॥ काळ कोणा न सोडी ॥ पायी प्रपंचाची बेडी ॥ न कळे जातो तांतडी ॥ सार्थक झालें नाहीं पैं ॥३६७॥ काळाचे जंग बैसती टोले ॥ तंव तुज कोण सोडविल मोलें ॥ सारें आयुष्य निघोनी गेलें ॥ मग चडफड करिती ॥३६८॥ दादल्या देखतां काळ बायकांशीं नेतो ॥ बायको देखता दादला मरोनी जातो ॥ या दोघां देखतां सारीं पोरे काळ खातो ॥ ऐशीं जनाची आटाआटीं ॥३६९॥ काळ लागला पाठीसी ॥ खातो लहान मोठ्यासी ॥ नेतो उठाउठीसी ॥ कोणासी तो सोडींना ॥३७०॥ रामरूपाचा थोर पैसपैसा ॥ देहींचा न कळे कोणा कैसा ॥ ध्यास लागला अधेला पैसा ॥ रामरूपा नाहीं भेटो ॥३७१॥ स्वरूप नीट उभें पाहावें ॥ कीं आडवें निजलें म्हणावें ॥ समोरले पाठी ठेवावें ॥ हें तो न घडे पैं ॥३७२॥ संतसंगतीचेनि मेळें ॥ स्वरूपीं थोर दृष्टी खेळें ॥ पदोपदी समाधि रुळे ॥ अजप जपल्याविण ॥३७३॥ खोल भूमिकेंत काय गोळा झालें ॥ उठी





कोणा काय निरसोनी गेलें ॥ चिखलात काय रुतोनि पडलें ॥ स्वरूप चोजवेना ॥३७४॥ हाताशी न येते धरूं जातां ॥ ते कैसैने हो येईल हाता ॥ गुप्त गोचर खरें असता ॥ प्रगट दिसों लागें पैं ॥३७५॥ प्रगट तें प्रगट होईना ॥ नयना वेगळे हे जाईना ॥ नयनी कोंदले माईना ॥ अपार स्वरूप ॥३७६॥ अपार त्यासी पार नाहीं ॥ खरा कोण चाळक देहीं ॥ व्यापक थोर ठाई ठाई ॥ तों देव न कळे ॥३७७॥ सहज तटस्थ समाधि लागली पातीं ॥ कोण सांपडे हा काळाचे हातीं ॥ तेथे नाहीं दिवस राती ॥ तेथें नांदविले गुरु देवें ॥३७८॥ रूप नाहीं तो देव, देव पूजेसी कसा मांडावा ॥ कांही नाहीं तो देव, देव पूजेंसी कैसा पूजावा ॥ रूपरेखा नसे तो देव ध्यानीं कैसा आणावा ॥ तो मज न कळे गुरुराया ॥३७९॥ देव दृष्टींच्या मुळा अलिकडे ॥ देव दृष्टीच्या अग्रा पलीकडे ॥ देव दृष्टीसी व्यापूनी चहूंकडे ॥ असे उपरी नेणती ॥३८०॥ अरूप रूपाचें स्थापन स्थापी ॥ जी वस्तु चळेना कदापि ॥ स्वरूप रूपाची वाट सोपी ॥ कळेना कदां कोणासी ॥३८१॥ न कळे अजप जपाचे जपणें ॥ वस्तुसी थोर पडले झांकणें ॥ मुळींच उघडोनी लोचन ॥ स्वरूप दाखविले ॥३८२॥ अरूप काय सारें मेलें ॥ निर्गण काय उठोनी गेलें ॥ निरंजन हे काय पळालें ॥ त्या भक्ताचेनि बळें ॥३८३॥ देव दिसे सदां सन्मुख ॥ दुणावे समाधीचे हो सुख ॥ काय जाणें हे मानवी मूर्ख

॥ आत्मस्वरूप नेणवे ॥३८४॥ ध्यान चढलें अरूपीं ॥ समाधी तटस्थ स्वरूपीं ॥ काय देखावें तद्रूपीं ॥ जेणें देखणें मावळे ॥३८५॥ स्वरूपाचे रूपडे ॥ उभे चहूंकडे ॥ गुप्त असोनि उघडें ॥ समाधी न कळे पैं ॥३८६॥ न कळे हें काय रोडलें ॥ सुकले काय मोठे झालें ॥ प्रळय भयाने काय पळालें ॥ हे तो न घडे तयासी ॥३८७॥ सूर्यतेजें व्यापुनीं छपें ॥ चंद्रतेजे व्यापुनी लपें ॥ अंधारांत तेज तपे ॥ अतेज तेजें भरलासे ॥३८८॥ सांडोनि थोर सहज समाधीं ॥ लावी खेचरी अनादी ॥ पडली नाना साधन उपाधी ॥ उपाधि वेगळा आत्मा असे ॥३८९॥ अरूप रूपाचा बैसला माच ॥ अभयपद हें अक्षय साच ॥ याची या परतें जें अनिर्वाच्य ॥ हें बोलवेना ॥३९०॥ हात लावितां नातुडे ॥ दृष्टी ज्यामाजी बुडें ॥ तें तव उभें मागें पुढे ॥ जवळी असोनी न कळे पैं ॥३९१॥ थोर समाधी दाट ॥ पाहातां नयनां फाट ॥ समाधीचा सांठला सांठ ॥ सर्वा ठाई ॥३९२॥ सूर्याविण प्रकाशफेरी ॥ चंद्राविण चंद्रकला कोरी ॥ देवाविण देव द्वारीं ॥ उभा असे ॥३९३॥ सांग अध्यात्म्याची खोली ॥ कोण बोलवितो बोलीं ॥ अजप जपातें कोण तोली ॥ सत्ताधीश कळेना ॥३९४॥ नयनापरता नयन भासे ॥ देवापरता देव दिसे ॥ रूपावर तें रूप वसे ॥ तें कळे कोणाशीं ॥३९५॥ त्यासी कोठोनि नाहीं येणें ॥ कोठवरी लांब नाहीं जाणें ॥ ठाई ठाई घनपठले घनें ॥ अक्षय





स्वरूप तें ॥३९६॥ त्यासी नाहींत कांही कामें ॥ ते सहजची रिकामें ॥ त्यासी पाचारावे अनाम नामें ॥ नामरूपा वेगळे ॥३९७॥ तें कोठोनी सारें नलगे आणावें ॥ की चळ अचळ बैसले म्हणावें ॥ आतां काही रूप वानावें ॥ सद्गुरुचे निजमुखें ॥३९८॥ येतां जातां भेटी लागीं भेटतें ॥ सारा देवची झालासे वाटतें ॥ ठाई ठाई गुप्त गोचर सांठते ॥ गुप्त देव न कळे ॥३९९॥ माझा देव सर्वासमोर उभा ॥ काय सांगों थोर दर्शनाची शोभा ॥ सांडोनीं मायेच्या थोर लाभा ॥ देव देखावा ॥४००॥ सदा स्वरूपीं जन असे ॥ जनास्वरूप केविं भासे ॥ ज्याचें गुज त्याला न दिसे ॥ जग वेडावक थोर भुली ॥४०१॥ ज्याचे त्याला नेणवे ॥ देहीं दुःख दुणावे ॥ सार्थक नाहीं ठावें ॥ पडली चुकी ॥४०२॥ ज्याची त्याला नाहीं सोय ॥ आणीका पुसे उपाय ॥ कवणें म्हणावें त्याला काय देह ॥ आटणा घातली ॥४०३॥ हे सगुण रूप सगुण ॥ त्यांत भरलें निर्गुण ॥ कोण दाखवील आत्मखूण ॥ खूण मुद्रेवेगळी ॥४०४॥ नयनी भरले अंजन ॥ दिसों लागलें हे निजधन ॥ मग ठेविलें नेऊन ॥ गुप्त खोलीं ॥४०५॥ स्वामींचे अंजन नयनीं लेतां ॥ वस्तु दिसों लागे समान सत्ता ॥ हें निजधन सांठवूं कोठें आतां ॥ जागा मजला मिळेना ॥४०६॥ जगद्गुरु नयनी अंजन करवी ॥ दिसोंलागें निजधनाची चरवी ॥ धन सांठवोनी निरवी ॥ तोची

साधु जाणावा ॥४०७॥ झाली निजधनाची धनभेटी ॥ दारिद्र जातें उठाउठीं ॥ हें धन पायी कोण लोटी ॥ अभागी नष्ट जे ॥४०८॥ अतेज अनाम वस्तु म्हणावी ॥ सर्वांते तेज भरपुर भरवी ॥ या चंद्रसूर्याते कोण फिरवी ॥ तो देव न कळे कीं ॥४०९॥ किं समोरलें पाठी ठेवावे ॥ किंवा पाठीचे समोर आणावें ॥ किं आकाशीचें पाताळी न्यावें ॥ हें तो न घडे पैं ॥४१०॥ अचळ चाळितां चळेना ॥ खूण दाविता ते दिसेना ॥ अप्राप्त वस्तु हें ठसेना ॥ सद्गुरुविणे पैं ॥४११॥ खरें थोर अतर्क तर्कावें ॥ चुकलें ठेवणें हुडकावें ॥ मुळची पुसणें करीत जावें ॥ आपुलीया उगमाने ॥४१२॥ आपुल्या उगमा जंव नेणें ॥ नातुडें कांही केल्या आत्मखुणें ॥ लागले पाठी जन्ममरणें ॥ गर्भवास चुकेना ॥४१३॥ थोर घर अध्यात्मविद्येचे ॥ साधन साधे सर्वसिद्धींचे ॥ सुख सुखावे आत्मपदींचे ॥ आत्मपदी सत्पुत्री नांदावे ॥४१४॥ अध्यात्मविद्या ज्यासी व्हावी ॥ तेणें संतसंगती धरावीं ॥ थोर हे आत्म कळा जमावी ॥ सद्गुरुचेनि बळें हो ॥४१५॥ अध्यात्म विद्येचे ज्ञान नाहीं ॥ आपुले हित नेणवें कांही ॥ देवापरता देव देहीं ॥ तोही न कळे मूर्खपणें ॥४१६॥ अध्यात्मचर्चा नित्य असावी ॥ वस्तुलागी शास्त्रें शोधावीं ॥ थोर अद्वैत शास्त्रे पढावी ॥ जेणें वस्तु आतुडे ॥४१७॥ ज्यासी निरंजनी निद्रा लागली ॥





त्यासी कोण उठवूं गेली ॥ वेदशास्त्रे माघारी परतली ॥ पार न कळे ॥४१८॥ थोर निरंजनी लागली निद्रा ॥ कोण खोली ब्रह्मकपाट मुद्रा ॥ दशवें द्वाराच्या महा छिद्रा ॥ कोण खोलोनी दाखवी ॥४१९॥ निरंजनी निजोनीं राहे ॥ त्यासी उठवूं कोण पाहे ॥ स्वर्ग सुखाते तोची लाहें ॥ निजनिद्रेचीया मिषें ॥४२०॥ निरंजनी निजनिद्रेचा भर ॥ तेथें योगियां निद्रा न सावरें ॥ मग समाधीचे सुख थोर ॥ निजीं निद्रा लागली ॥४२१॥ देवरूप होवोनी आंगे ॥ निरंजनी निद्रा लागे ॥ या सुखातें कोण सांगे ॥ न मिळे इचा पारखी ॥४२२॥ निरंजन ओघीं मिळाला ॥ तो परतोनि नाहीं आला ॥ जन्म कैचा तयाला ॥ येणें जाणें न घडे पैं ॥४२३॥ ज्यासी येणें जाणें नाहीं ॥ तो बसतो कोणे ठायीं ॥ बरवें विचारुनी पाहीं ॥ संतालागीं ॥४२४॥ चपळ चाळक मुरारी ॥ देहापरता तो देह धारी ॥ हालवी सर्वांची हि दोरी ॥ दोरी धरोनी वेगळा ॥४२५॥ जपावीण तें जपावें ॥ ध्यानावीण ध्यानीं ध्यावें ॥ नयनावीण तें पहावें ॥ स्वरूप जें ॥४२६॥ पूजेपरतीं स्वयंभू पूजा ॥ नाठवे कांही हा देव दूजा ॥ देवची दिसतो ही प्रजा ॥ देवची सारा भासतसें ॥४२७॥ भेटीविण हे क्षेम ॥ आलिंगी आत्माराम ॥ सावळा घन:श्याम ॥ उभा माझें अंगणीं ॥४२८॥ आभास निरंजन निर्विकार ॥ विकाररहित न कळे पार ॥ अद्वयपद हें साराचें सार ॥ आत्मा अविनाश न कळे ॥४२९॥ भ्रमर गुंफेचे

तळुवटी ॥ चिन्मयाची थोर दाटी ॥ ज्योत उभी हे गोल्हाट तटीं ॥ फटफटीत दिसे ॥४३०॥ निरामय थोर निर्मळ ॥ सर्वांघटी तयाचा खेळ ॥ याचा कां पार न कळे ॥ थोर भुली ॥४३१॥ लागावें अध्यात्मचर्चेच्या अध्यात्मा ॥ जेणें कळे आपुला परमात्मा ॥ तेथें रीघ कैचा जन्मकर्मा ॥ येणें जाणें चुके पैं ॥४३२॥ अध्यात्म बोलणें बोलावें अंतरीचे ॥ अंतरीचें गुज खोलावें ॥ पारखोनी गुप्त ठेवावें ॥ ज्याचें त्यानें ॥४३३॥ आपुलीया सुखातें पावावें ॥ पावोनी परतें पार व्हावें ॥ बरव मूळच्या मूळा शोधावें ॥ मग मुळी जातां जन्म नाहीं ॥४३४॥ आत्मचर्या नित्य करावी ॥ ज्ञानकळा ही पाजळावी ॥ मग आत्मकळा देखावी ॥ सद्गुरुकृपे ॥४३५॥ कां आत्मचर्चेसी चुकावें ॥ आपुलीया हिता कां मुकावें ॥ सद्गुरुसी शरण जावें ॥ अनन्यभाव करूनिया ॥४३६॥ ज्यासी हा परमार्थ व्हावा ॥ त्यानें हा ग्रंथ शोधावा ॥ तूर्तबोध बोधवावा ॥ स्वमनी आपुल्या पैं ॥४३७॥ जरी पूजनीं सादर व्हावें ॥ तरी या आत्मया जाणावें ॥ सहज देहीं सुख पावावें ॥ सद्गुरुचेनि बळे ॥४३८॥ अनुभवावीण बोलणें ॥ तें जाणावें लाजिरवाणें ॥ समाधाना आणिलें उणें ॥ काय करावें तयासी ॥४३९॥ अनुभव कांहीच नेणें ॥ सेवेलागीं भोगें मानें ॥ काय जाणों त्याचें जिणें ॥ फट्फजिती जगी पैं ॥४४०॥ खूण दाखवितां कळेना ॥ अचळ मुद्रा चळेना ॥ कदापि घनघटेना ॥ सहज स्वरूपीं ॥४४१॥ हरी





उभा भोंवता ॥ देखण्या किं हो परता ॥ ठाव नाहीं रिता ॥ त्यावीण हो ॥४४२॥ नयनीं उभा थोर ॥ हरी उभा हा समोर ॥ चित्त चोरटें चार ॥ कळे कोणा ॥४४३॥ इंद्रियें कोंदाटली ॥ फटकर फाटलीं ॥ स्वरूपा वाट झाली ॥ देखावया ॥४४४॥ चालतां लागे पायांसी ॥ भिन्नलें सर्वांगासी ॥ उगमी थोर ब्रह्मराशी ॥ माझी गणना कोणकरी ॥४४५॥ मार्गी चालतां मार्गी दाटें ॥ रूपाविण समोर भेटें ॥ पाठीं-पोटीं खरें लिगटे ॥लिंग ठेऊनि वेगळें ॥४४६॥ घर भरोनी घरांत देव देखावा ॥ नलगे उसणा पासणा आणावा ॥ जेथें तेथें देव हा संचला पहावा ॥ पूजेलागी पैं ॥४४७॥ पूजेसीं जें सिद्ध झालें ॥ तेथें कोण पूजा करूं आलें ॥ पूजेविण उभे भोवतलें ॥ जेथें पूजा उपचार न साहे ॥४४८॥ भजनेंविण भजन प्राप्ती ॥पूजेविण थोर पूजा होतीं ॥ ऐसी विचक्षण आत्मज्योती ॥ भाग्य मोठें हों ॥४४९॥ अरूप आणोनि कैंसे पूजावें ॥ पूजे विसर्जनी कोठें ठेवावें ॥ येत ना जात त्यास कैसें आणावें ॥ अचल जेथील तेथें ॥४५०॥ रूपरेखा नसे ज्यासी ॥ पूजावें कैसें हो त्यासी ॥ ध्यान धारणा उदासी ॥ जेथें होय ॥४५१॥ देवपूजा परती सारावी ॥ निर्गुण आत्मकळा ही जाणावी ॥ जन्मकर्माची पाळी चुकवावी ॥ स्वहितालागीं हो ॥४५२॥ थोर पूजेविण पूजा घडे ॥ भजनेंविण भजन जोडे ॥ ध्यानाविण देव हा आतुडे ॥ संत संगतीचेनि बळें ॥४५३॥ थोर क्रियेविण कर्म

॥ आणि दानाविण दानधर्म ॥ ध्यानाविण परब्रह्म ॥ हातीसीं आले पैं ॥४५४॥ शिरीं वाघ्रांबर चर्म ॥ तीर्थ भ्रमणीं भ्रम ॥ योगियां न कळे योगकर्म ॥ न कळे विचार आत्मयाचा ॥४५५॥ संत संगतीचेनि बळें ॥ देवचि दिसे हो सकळ ॥ निजब्रह्म थोर आकळे ॥ मजसहित देव दिसे ॥४५६॥ देवामाजी मी देव झालो ॥ संत सेवेसीं मी उरलों ॥ देवाचे पोटीं मी रिघालों ॥ देव देखावया ॥४५७॥ संतसंगे देव दिसे सारा ॥ दुश्चित द्वैता नाहीं थारा ॥ चुके अघोर जन्माचा फेरा ॥ येणें जाणें पैं नाहीं ॥४५८॥ मार्गी चालतां मार्गी दाटें ॥ सर्वांगीं सर्व प्रकटे ॥ रूपाविण सन्मुख भेटे ॥ तें काय असें हो ॥४५९॥ सद्गुरुअंजन नयनां चढें ॥ स्वरूपीं दृष्टी निर्मळ उघडे ॥ हरी दिसों लागे हा चहूकडे ॥ नवल चोज पैं ॥४६०॥ चालता देव न चाले ॥ हालतां देव न हाले ॥ बोलतां देव न बोले ॥ उपाधी वेगळा देव ॥४६१॥ त्या देवासी कैंसें पाहावें ॥ देवपण कोठें स्थापावें ॥ देव होऊनि वर्तावें ॥ सद्गुरु कृपें ॥४६२॥ देव सर्वांगी हा दाटे ॥ देव जग झालें शेवटें ॥ जेथें तेथें देवची भेटे ॥ रूपाविण हो ॥४६३॥ माझा देव मजपासी ॥ भिन्नला हो सर्वांगासी ॥ पार नाहीं या सुखासी ॥ जेथें तेथें देव उभा ॥४६४॥ पुरता देव आला आंगा ॥ या देवा कोण कोठील सांगा ॥ भिनोन गेला सर्वांगा ॥ देव ज्या सांडीना ॥४६५॥ देवाचे आंगीं भरलें वारें ॥ देवची जगत्रय दिसें सारें ॥ थोर कोंदली





इंद्रियेद्वारें ॥ देवरूपें हो ॥४६६॥ आंगीं थोर आला देव ॥ घुमवितो जीवशिव ॥ या देवाचा न कळे ठाव ॥ देह झाडां हिंडवी ॥४६७॥ देवाच्या आंगीं भरला वारा ॥ देवची दिसे जगत्रय सारा ॥ देव आला न जाय माघारा ॥ देह झाडां भुलला ॥४६८॥ देव आंगीं आला मुका ॥ या देवाचा थोर ठोका ॥ चाळवितो जना लोकां ॥ देह झाडां घुमवी ॥४६९॥ देव आंगी आला मोठा ॥ या देवाचा नाहीं तोटा ॥ आला भक्ताचीया पोटा ॥ सेवा उचित मागे ॥४७०॥ थोरला देव आंगीं येतो ॥ देवरूप हा जन होतो ॥ सकळ कळे हा चालवितो ॥ सूत्रधारी तो येक ॥४७१॥ देव आंगी येऊनि नाचे ॥ थोर मुका हा अनिर्वाच्य ॥ बोलवी बोल अध्यात्माचे ॥ देह झाडां सफळ करी ॥४७२॥ सांपडलें देवाचे मेळीं ॥ लागोनी गेलीं ब्रह्मटाळीं ॥ चुके थोर जन्माची पाळी ॥ संतसंगे हो ॥४७३॥ पुरता देव आंगीं आला ॥ सारा देव दिसों लागला ॥ नाचवी जगत्रय जगाला ॥ चालकपणें हो ॥४७४॥ देव आंगीं आला मोकळा ॥ देवांचा भोंवताली पाळा ॥ रूपचि नाहीं त्या गोपाळा ॥ कैसे देखावें ॥४७५॥ जना आंगीं देव आला भारीं ॥ देव दिसे सृष्टी सारी ॥ जेथें निर्गुण श्रीहरी ॥ रूपाविण देखणा ॥४७६॥ आंगीं आला थोरला गुप्तदेव ॥ अवघा झाला शिवमय जीव ॥ स्वरूप कोंदलें घटघटीव ॥ देह झाडांसी तारी ॥४७७॥ आंगीं देव आला जाणूं ॥ जग देवरूप हें मानूं ॥ जगावेगळा देव आणूं

॥ ध्यानार्सीं पैं ॥४७८॥ स्वरूप अचंबळ बळकट बांधा ॥ स्वरूप नाहीं कोठें तुटका सांधा ॥ स्वरूप वेगळें गुप्त गोविंदा ॥ देखावें पैं गा ॥४७९॥ स्वरूप दाटलें दाटीव ॥ कोंदले शिवरूप शिव ॥ देहींचा थोर झाला देव ॥ सद्गुरुकृपे ॥४८०॥ सावधानचित्ती आसनीं असावें ॥ या अजपा जपाचे ध्यानी लागावें ॥ तरीच परम पद हें पावावें ॥ अक्षय सिद्धी जें ॥४८१॥ जनघसनी स्वरूप न चोळे ॥ महाअग्नी लाविता न पोळे ॥ पडिलें महासूर्याचे खोळे ॥ ते स्वरूप देखावें ॥४८२॥ हातें लोटितां न लोटे ॥ देखूं जातां नयनीं दाटें ॥ आहे अरूपी पायवाट ॥ पार व्हावया हो ॥४८३॥ अक्षय असे मोकळें ॥ हें ढिसाळ कोणा न कळें ॥ जनीं निजधर्म कैसें आकळे ॥ उपाय नाही ॥४८४॥ स्वरूपाची थोर शोभा ॥ जेथें तेथें हरी उभा ॥ भेदुनी गेला या नभा ॥ पार न कळें ॥४८५॥ अक्षय पदींचे अक्षर ॥ नयनीं स्थिरावें स्थिर ॥ सहज समाधी उशीर ॥ नाहीं देखावया पैं ॥४८६॥ स्वरूप सर्वांगी लागे ॥ थोर उभे तूर्येचें मागे ॥ निर्गुण अचळ अभंगें ॥ जेथे तेथें उभें असें ॥४८७॥ निरामय निर्गुण अक्षर ॥ अचळ तें सर्वांहूनि थोर ॥ रूपाविण सहज समोर ॥ देवरूप सारें दिसे ॥ ४८८॥ ठायीं ठायीं होतसे पूजा ॥ पूज्य पूजक नाहीं दुजा ॥ जरी देवरूप उमजा ॥ भजनीं लागा उमजोनी ॥४८९॥ भजनाविण भजन न चालें ॥ रूपाविण देवघरा आले ॥ आत्मस्वरूप दिसों लागलें ॥ सुख





मोठें ॥४९०॥ अजप जपातें जपावें ॥ मग या देवाते देखावें ॥ थोर समाधी सुखाते पावावे ॥ सद्गुरुकृपे ॥४९१॥ या देवाचा नाही ठाव ठिकाण ॥ दिसे अरूपरूपें समान ॥ कोंदले अक्षय हें निर्गुण ॥ मावता मावेना ॥४९२॥ अनुभवें देव जोडे ॥ या मनाची धांव मोडे ॥ निजमुद्रा हे आतुडे ॥ संतसंगी ॥४९३॥ देव देखोनियां परता ॥ देव देखोनिया आर्ता ॥ देव पुरला हा पुर्ता ॥ सर्वांसी पैं गा ॥४९४॥ पाहाता नदिसे लोचना ॥ तेथें न दिसे थोर खुणा ॥ कांही नाहीं ते वर्म जाणा ॥ संतसंगतीनें हो ॥४९५॥ नयनीं थोर समाधी दाटे ॥ जग ब्रह्म झालेंसे वाटे ॥ देव येऊनि स्वत: भेटे ॥ नवल चोज ॥४९६॥ नयनीं स्वरूप खेळे ॥ रूपाविण तें आढळें ॥ देखणें थोर निवळे ॥ आत्मरूप देखावया ॥४९७॥ क्षराअक्षरा हें निराळें ॥ पर नावासीं हे वेगळें ॥ न पडे तुर्येंचे खोळे ॥ सच्चिदानंद जे ॥४९८॥ देव गोल्हाट शिखरीं ॥ देव तुर्येंचे माजघरीं ॥ अचळ दशवें द्वारीं ॥ चालवितो सकळांसी ॥४९९॥ नयनीं झळझळीत दिसे ॥ या पाण्यावरी जोत प्रकाशे ॥ थोर पाठीं लागले जन्मपिसें ॥ म्हणोनि देव हा कळेना ॥५००॥ कुळ दैवतांची सेवा जाणे ॥ थोरला देव पापी नेणें ॥ पाठीं लागलें येणें जाणें ॥ दु:ख मोठें सुटेना ॥५०१॥ जेथें वेगें जीव शिव सांठे ॥ पाहतां अवघें ब्रह्मदाटे ॥ तदसे मुक्तीची मोकळी वाट ॥ निर्मळ स्वरूपीं ॥५०२॥ देव बोलवितां न बोले

॥ देव हालवितां न हाले ॥ देव चालवितां न चाले ॥ स्वयंभ जेथील तेथें ॥५०३॥ स्वयंभा सारें अनुभवाचें आंगें ॥ योगियां मोकळी समाधी लागे ॥ गुप्त हें देवरूप वागे ॥ मागें पुढे पैं ॥५०४॥ थोर आत्मयाची खुण बाणें ॥ आत्मा दिसों लागे समसमानें ॥ चुकलें हें अघोर मरणें ॥ सद्गुरुकृपें ॥५०५॥ अचळ हें चळेना ॥ अढळ ते ढळेंना ॥ समोरलें जायेना ॥ अक्षय रूप जें ॥५०६॥ स्वरूप फाडितां न फाटे ॥ स्वरूप तोडितां न तुटे ॥ प्रळय आटणीं न आटे ॥ अक्षय वस्तु अपार ॥५०७॥ जिकडे तिकडे अरूप ॥ सहज समाधींचे स्वरूप ॥ थोर लाऊनियां आत्मदीप ॥ प्रकाशीं असावें ॥५०८॥ आत्मा नलगे कोठुनी आणावा ॥ थोर आत्मया लाग करावा ॥ सदां सन्मुख देखावा ॥ संतसंगे हो ॥५०९॥ जपतां अजपाची माळ ॥ देवरूप दिसों लागे सकळ ॥ मुद्रा लागली अक्षय अढळ ॥ अक्षयरूपीं ॥५१०॥ जेथें समाधी सुख दाट ॥ स्वरूपीं झाली अक्षयवाट ॥ थोर मुद्रा लागली अचाट ॥ ही अखंड समाधी ॥५११॥ कदां चळेना ती समाधी ॥ तेथें कैंची साधन उपाधी ॥ साधन साधक काय साधी ॥ साधनावेगळे स्वरूप ॥५१२॥ तेंथें साधन मुद्रा कैंसी लावावी ॥ आसन-मुद्रा तैं वेगळी ठेवावी ॥ ध्यान मुद्रेविण ही वस्तु देखावी ॥ सहज समाधी लागे ॥५१३॥ वस्तु कोठोनी नलगे आणावी ॥ वस्तु जेथील तेथें देखावी ॥ नयनीं गुप्त करुनि ठेंवावी ॥





गुप्त करूनि सर्वांसी ॥५१४॥ नंतर महापदा नेणवे ॥ बुद्धीसि कैसें होईल ठावें ॥ विवेकतर्का देव न फावे ॥ सद्गुरुविणा ॥५१५॥ जनघसणी कदां न चळे ॥ महाबळकट मळीन मळे ॥ अग्नी प्रवेशतां न जळे ॥ न भिजे कदा मेघमंडळीं ॥५१६॥ पाहतां या स्वरूपाची नाहीं सीमा ॥ रूपरेखा नसे घन:शामा ॥ कैसें पाचारावे अनामनामा ॥ नामातीत जें रूप ॥५१७॥ स्वरूप देखावया जंव जावें ॥ तेव्हां कांही नाहीं तेचीं व्हावें ॥ अढळपदी अचळ असावें ॥ सद्गुरुकृपें ॥५१८॥ स्वरूप थोर ही देखणी कळा ॥ रूपाविण वर्णावी ज्याची लीळा ॥ स्वयंभ ब्रह्मरसाचा पुतळा ॥ अखंड दिसे ॥५१९॥ या ग्रंथीं संचरे गुरुदेव ॥ म्हणोनिया कवित्वा फाव ॥ अध्यात्म चर्चेचा उपाव ॥ गुप्तरूपें सांगतसे ॥५२०॥ तो देव ऱ्हदयीचें गुज ॥ नाना शास्त्रींचे निज ॥ आणिक पुराणींचे बीज ॥ बोलवी गुरुदेव ॥५२१॥ देवरूप हें सारें दिसें ॥ देवपूजेसी कांही नसे ॥ पूजेविण पूजा होतसे ॥ महापूजा प्रभूची ॥५२२॥ तेथें कैची रूप-रेखाकळा ॥ स्वयंभ ब्रह्मरसाचा पुतळा ॥ सर्वांचा थोर देखणा डोळा ॥ चिन्मात्र चिद्रुप हो ॥५२३॥ स्वरूपा नाहीं खाच खळगा ॥ रूप नाहीं तो देव ओळखगा ॥ न दिसे थोर मुक्तीच्या भोगा ॥ संतसंगे करूनी ॥५२४॥ दृष्य देखणें तें परतें सारावें ॥ मग निव्वळ आत्मयातें देखावें ॥ जन्म मरणापासोन सुखी व्हावें ॥ सद्गुरुकृपें करुनियां

॥५२५॥ डोळीयापरता डोळा उगवे ॥ या चंद्रसूर्याचा लाग न फावे ॥ तें देखणें सद्गुरुकृपें फावे ॥ मज देखावया ॥५२६॥ या डोळिया परता डोळा लागे ॥ निजशेजे निजोनी कोण जागे ॥ सहज समाधी चाळवूं लागे ॥ निजनिद्रेचेनी मिषें ॥५२७॥ डोळीया परता डोळा उघडे ॥ माझें मज हें ठेवणें सांपडे ॥ धन दिसों लागे चहूंकडे ॥ निजात्म स्वरूप आत्मयाचे ॥५२८॥ निजशेजे निद्रा लागे ॥ सहज समाधी सहज जागे ॥ मुद्रा लागली अचळ अभंग ॥ सद्गुरुकृपें करुनी ॥५२९॥ महाप्रळयी दृष्य मावळलें ॥ परी स्वरूप नाहीं हलविलें ॥ घटी मठीं ब्रह्म हें कालविलें ॥ अचळपणें ॥५३०॥ लाउनी ज्ञानाचा ज्ञानदीप ॥ आत्मा दिसों लागे समीप ॥ भरलें सारें निजरूप ॥ घटीं मठीं जगी पैं ॥५३१॥ आत्मयाची थोर अजोत जोती ॥ पाहतां तटस्थ लागली पाती ॥ धरूं जातं न लगे हातीं ॥ अक्षय स्वरूप जें ॥५३२॥ लागला डोळिया परता डोळा ॥ नवल समाधीसुख सोहळा ॥ योगियांचा मुक्तिसोहळा ॥ तारक जगीं होती ॥५३३॥ अक्षयी ठेवातेंठायी पहावें ॥ काहीं नाहीं त्या देवा देखावें ॥ जेथें तेथें गुप्तदर्शन घ्यावें सद्गुरुचेंनि बळें ॥५३४॥ मेघधारी कदा भिजेना ॥ खड्ग घालो जातां तुटेना ॥ प्रलय आटणीं आटेना ॥ अक्षय रूप हो ॥५३५॥ चाळू जातां चाळेना ॥ गाळूं जातां गाळेना ॥ पाडूं जातां पडेना ॥ आत्मस्वरूप जें ॥५३६॥ काष्टें मोडितां न मोडे ॥ जळीं





समुद्रीं न बुडे ॥ महा वायूसी न उडे ॥ आत्मस्वरूप तें ॥५३७॥ तेथें कैंचा नित्यनेम ॥ न चाले हो क्रियाकर्म ॥ न दिसें तें दावी वर्म ॥ सद्गुरुनिवास स्वामी जो ॥५३८॥ अलिप्त असूनी कोणा नाहीं लिप्त ॥ पाहता तें उभें समीप ॥ प्रकाशला आत्मदीप ॥ उजेड झाला चहूंदिशा ॥५३९॥ आपण कोठील कोठ जाणें ॥ मानवी मुर्ख जव हें नेणें ॥ कैसे चुकले जन्ममरण ॥ भवचक्र बा लवलाहे ॥५४०॥ म्हणोनी आधी आत्मा शोधावा ॥ पुरता संतसंग धरावा ॥ थोरला देव होईल ठावा ॥ जेणे जन्ममरण चुके ॥५४१॥ ही जागां कोण चालवितो ॥ या बोला कोण बोलवितो ॥ सकळ कळा कोण हालवितो ॥ तो देव कळेना ॥५४२॥ जयासी नाहीं डाळमूळ ॥ दिसों लागलें तो केवळ ॥ तें देखतां दृश्य मावळे ॥ सद्गुरुकृपें ॥५४३॥ नयनीं कोंदलें किंवो माय ॥ त्यासी म्हणावें कोण काय ॥ आतां कोठें ठेवावे पाय ॥ सारासार दिसे हो ॥५४४॥ नयना लागे चिन्मय खाण ॥ चिन्मय रूप दिसे समसमान ॥ चिन्मय ते जें कोंदले त्रिभुवन ॥ अष्ट दिशा उजाडल्या ॥५४५॥ सारा मजला दिसे देव ॥ त्यावीण नाहीं रिता ठाव ॥ देखणी कळा दिसों फावें ॥ सद्गुरुकृपें ॥५४६॥ दिसतां देव भलताची पूजी ॥ न दिसे त्या देवा नेणिज वाहाजीं ॥ देहींचा देव केला नाहीं राजी ॥ हळहळ मोठी वाटतसे ॥५४७॥ कांही नाही तेंची देवरूप ॥ दृष्टीस जडलें ते थोर अमूप ॥ सहज

समाधीचे स्वरूप ॥ संतसंगे आतुडे ॥ ५४८॥ जुनाटजुना हा देवराणा ॥ न कळे वेदशास्त्रां पुराणां ॥ न दिसे तेंची दाखवी खुणा ॥ सद्गुरु दयाळ जो ॥५४९॥ तूर्तबोधसार पाहावा ॥ या आत्मयाचा शोध घ्यावा ॥ देव आपुला करावा ॥ संतसंगेही ॥५५०॥ तूर्तबोध हा बोलवी ॥ सद्गुरुमाझीये जीवी ॥ सारे अध्यात्म वदवी ॥ दीन हैबतचिनि मुळें ॥५५१॥ थोर जे वेदशास्त्रींचे कानडे ॥ नाना साधने न कळे कैवाडे ॥ तेथें हैबतीं काय बापुडे ॥ मतीहीन ॥५५२॥ या कैवल्यनाथें कृपा केली ॥ म्हणोनि वाक्यें बोलतां आलीं ॥ आध्यात्म रंगे रंगलीं ॥ श्रोते हा श्रवन कीजें ॥५५३॥ इति तूर्तबोध ॥ श्रीगुरुशिष्यसंवाद ॥ अध्यात्मशास्त्राचें मथित ॥ सद्गुरुकृपें हैबती ॥५५४॥ श्रीगुरुनाथार्पणमस्तु ॥ शके सत्राशेंबासष्ट ॥ शार्वरीसंवत्सर चोखट ॥ फाल्गुन वद्य द्वादशी श्रेष्ठ ॥ तिथीं वार शुभ नक्षत्र पैं ॥५५५॥ शुभ वेळे ग्रंथ संपूर्ण ॥ झाला असे परिपूर्ण ॥ आतां संरक्षकांची नामखूण ॥ कळवूं पूर्ण श्रोतियां ॥५५६॥ **॥ इति तूर्तबोध समाप्त ॥**

● टंकलेखन : **श्री. दयानंद महादेव धनवडे**, विवेक कॉम्प्युटर हाऊस, ''कैवल्य'' ९२४/३०, विशालनगर, हुपरी-४१६२०३, जि. कोल्हापूर. **फोन :** ०२३०-४५०३६४/६५, **मोबाईल :** ०-९८-२२०-६६५९५ (दि. ०५-०७-१९९८ वेळ सायं. २०.०० आषाढ शुद्ध एकादशी शाहू महाराज जयंती दिनी पूर्ण)



## • आरती •

आरती सद्गुरु नाथा । स्वामी निरंजन समर्था ॥धृ॥
सदाचार सार साचा । मंत्र दिधला जीवनाचा ।
सर्व धर्माचा साधुनी समन्वय । दाविला मार्ग अद्वय ॥१॥
विवेक वैराग्याचा दीप । लावूनी चरणा समीप ।
उज्जयनी शाखा, विहंगम । शांभवी दिक्षा सुगम ॥२॥
दूर केले हो आवरण । त्रिवेणी संगमी स्नान ।
स्वयम्प्रकाशे भगवान । निखळ आनंदी रममान ॥३॥
सद्गुरु कृपा होता । अवघी हरपली चिंता ।
विनयानंद विनवी आता । चरणी ठेवूनीया माथा ॥४॥

अद्वैत वेदांतपर ''**तूर्त बोध**'' हा ग्रंथ सध्या दुर्मिळ झाला आहे. तो पुनर्मुद्रित व्हावा या सद्हेतूने प. पू. सद्गुरु श्री निरंजन महाराज यांनी त्याची एक प्रत माझेकडे दिली होती. महाराजांची प्रथम पुण्यतिथी, शारदामाता जयंती मार्गशीर्ष कृष्ण ७ शके १९२० गुरुवार दि. १० डिसेंबर ९८ या पवित्रदिनी तूर्त बोध हा ग्रंथ प्रकाशन होत आहे, याबद्दल आम्हास अत्यानंद होत आहे.


– विनयानंद

**श्री सद्गुरु निरंजन महाराज आश्रम**
मौजे वडगांव, जि. कोल्हापूर

- प्रथम पुष्प : प्रति २०००
- देणगी मूल्य : १० रुपये
- प्रकाशक : अध्यक्ष, श्री सद्‌गुरु निरंजन महाराज सेवाभावी मंडळ, मौजे वडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.
- मुद्रक : प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर. ☎ ५२८४२७


हैबतीकृत अद्वैत वेदांतपर

# तूर्त बोध




श्री सद्‌गुरू निरंजन महाराज आश्रम, मौजे वडगांव, जि. कोल्हापूर.